जुलै २०२३ । पृष्ठे : ५२

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र आरोग्य पत्रिका

## १ वर्षपूर्ती

### सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतलेले
## महत्त्वपूर्ण निर्णय व राबविलेले उपक्रम







**सारे काही सर्वांसाठी, सर्वांच्या आरोग्यासाठी !**

नेतृत्व, संघटनात्मक वर्तनामध्ये योग्य तो बदल घडून आणते.
क्षमता, इच्छाशक्ती, बुद्धिमत्ता आणि कार्याची कुशल आखणी या गोष्टी
परिवर्तनासाठी प्रेरणादायी ठरतात. नवी ध्येय, नव्या व अधिक उन्नत अपेक्षा ठेवून
क्षमता सिद्धीमुळे कार्याचीही समाजात नेहमीच नोंद होते.

वार्षिक वर्गणी : ₹ ५०/-



केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. मनसुख मंडाविया यांची राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी महाराष्ट्रात सुरु असलेल्या विविध आरोग्य योजनांबाबत त्यांनी चर्चा केली.



आरोग्य विभागाने गेल्या एक वर्षाच्या कालावधीत अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम जनसामान्यांच्या सेवेसाठी राबविले आहेत. यामध्ये माता सुरक्षित तर घर सुरक्षित, जागरूक पालक-सुदृढ बालक, सुंदर माझा दवाखाना, महाआरोग्य शिबिरे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे अनुदान पाच लाखापर्यंत वाढविणे, असे विविध लोककल्याणकारी निर्णय घेऊन आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे. याविषयीची माहिती पुस्तिका राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी माननीय केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. मनसुख मंडाविया यांना भेट दिली.

महाराष्ट्र
# आरोग्य पत्रिका
वर्ष : पंचविसावा | अंक : ०६ | महिना : जुलै २०२३

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

मुख्य संपादक/प्रकाशक
डॉ. कैलास बाविस्कर
उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.)

संपादन सहाय्य
बापूराव गर्जे
प्र. आरोग्य शिक्षण अधिकारी

अशोक निम्मलवार
प्रशासकीय अधिकारी

मुद्रण
कल्याणी कार्पोरेशन, पुणे
१४६४, मंगेशश्री, रेणुका स्वरूप स्कूल लेन,
सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

पत्रव्यवहारासाठी पत्ता
संपादक,
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग
'परिवर्तन', आरोग्य भवन परिसर,
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६.
दूरध्वनी : ०२०-२६६१०१७८,
२६६१०१७९.
फॅक्स : ०२०-२६६१०१८०
e-mail :
arogyapatrikamh@gmail.com

वार्षिक वर्गणी
५०/- रुपये

## १ वर्षपूर्ती

## सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय व राबविलेले उपक्रम

## मोबाईल हेल्थ

/MahaArogyaIECBureau @Mahahealthiec @Mahahealthiec @Mahahealthiec

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे द्वारा प्रकाशित

https://www.facebook.com/MahaArogyaIECBureau

https://twitter.com/MahaHealthIEC

https://www.instagram.com/mahahealthiec/

YouTube http://bit.ly/MahaArogyaYT

https://www.linkedin.com/company/maha-arogya-iec-bureau

संकेत स्थळ :
http.//maha-arogya.gov.in
http.//mahaarogyasamvadiec.in
maharogyasamvad

महाराष्ट्र आरोग्य पत्रिका

जुलै - २०२३

# अंतरंग


- आयुक्तांचे मनोगत ..... ०५
- संचालकांचे मनोगत ..... ०६
- संचालकांचे मनोगत ..... ०७
- संपादकीय ..... ०८
- मा. प्रा. डॉ. तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या नेतृत्वाखाली गेल्या वर्षभरातील आरोग्य विभागाची कामगिरी ..... ०९
- मा. वित्तमंत्री यांच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणातील सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित निर्णय/मुद्दे ..... १०
- **उपक्रम क्षणचित्रे** ..... १८
- **जागतिक लोकसंख्या दिन** ..... 22
- **आरोग्य विभागातील चार वरिष्ठ अधिकारी सेवानिवृत्त** ..... २४
- **सार्वजनिक आरोग्य विभागाची दमदार कामगिरी!!!** ..... २६
- **सार्वजनिक आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या सेवेशी !** ..... २९
- **राष्ट्रीय डेंग्यू दिवस** ..... ३३
- **लेप्टोस्पायरोसिस, जलजन्य आजार - प्रतिबंध, नियंत्रण व उपाययोजना** ..... ३५
- **आपल्या पाल्याच्या जडणघडणीत पालक व समाजाची महत्त्वाची भूमिका** ..... ३६
- **आशा संवाद** ..... ३८
- आशा उत्तरपत्रिका क्रमांक ७ - उत्तरपत्रिका जुलै २०२३
- आशा स्वयंसेविका गुणानुक्रम तक्ता माहे जुलै 2023
- **आरंभ उपक्रम** ..... ४३

  बालसंगोपन विषयावर सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानात प्रशिक्षण संपन्न
- **कविता** ..... ४४
- **वृत्त विशेष** ..... ४५
- आरोग्य भवन येथे स्व. वसंत नाईक यांची 110 वी जयंती साजरी
- महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण कार्यान्वित व हाफकिन खरेदी कक्षाकडील प्रलंबित विषयांचा आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्याकडून आढावा
- पावसाळ्यातील आरोग्यविषयक तयारीचा आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्याकडून आढावा
- वाघोली येथे ट्रामा केअर युनिट उभारणार
- शासकीय कार्यालय व परिसरात तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी
- 1 कोटी लाभार्थ्यांना आयुष्मान ई-कार्डचे वितरण करण्याचे मा. आरोग्य मंत्र्यांचे निर्देश
- आरोग्य विभागाच्या योजनांसाठी केंद्र सरकारकडून निधी कमी पडू दिला जाणार नाही
- कर्करोगासह असंसर्गजन्य आजारांना अटकाव करण्यासाठी आरोग्य विभाग व्यापक योजना राबविणार
- **लेखकांना विनंती** ..... ५०

१ वर्षपूर्ती
सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतलेले
**महत्त्वपूर्ण निर्णय व राबविलेले उपक्रम**
१०



२४ आरोग्य विभागातील चार वरिष्ठ अधिकारी सेवानिवृत्त



२६ सार्वजनिक आरोग्य विभागाची दमदार कामगिरी!!!

# आयुक्तांचे मनोगत



राज्यातील जनतेला उत्तम, दर्जेदार व परिणामकारक आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागा मार्फत राज्य व केंद्र शासन पुरस्कृत विविध आरोग्य योजना प्रभावीपणे राज्यात राबविण्यात येत आहेत. बालके, गरोदर माता, वयोवृध्द नागरिक व सर्वसामान्य जनतेपर्यंत चांगल्या व मोफत आरोग्य सेवा पोहोचविण्याच्या दृष्टीने आरोग्य विभाग वाटचाल करत आहे. आरोग्यवर्धिनी केंद्र, आपला दवाखाना, आपत्कालीन वैद्यकीय सेवा (१०८ ॲम्ब्युलन्स), ई संजीवनी ओपीडी यांसारख्या योजनांच्या माध्यमातून रुग्णसेवा अधिक बळकट व सर्वदूर पोहचविण्याचा प्रयत्न आहे. डॉक्टर्स व इतर कर्मचा-यांची रिक्त पदे प्राधान्याने भरण्याची कार्यवाही सुरु आहे, ज्यामुळे उपलब्ध मनुष्यबळावरील ताण कमी होण्यास निश्चितच मदत मिळणार आहे.

आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूर येथे दर्शनासाठी आलेल्या लाखो वारक-यांसाठी मा. आरोग्य मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाच्या वतीने महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते. महाआरोग्य शिबिरादरम्यान जवळपास ५ लाख वारक-यांनी शासनाच्या विविध आरोग्य सेवांचा लाभ घेतला. यासाठी राज्याच्या विविध भागांमधून ३ हजार ७१८ शासकीय व १ हजार खासगी डॉक्टर्स व विशेष तज्ञांच्या सेवा दिनांक २७ ते ३० जून या कालावधीत शिबिरात उपलब्ध करण्यात आल्या. या महाआरोग्य शिबीरातून नेत्रविकार, हृदयरोग, किडनी, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, दंतरोग, संसर्गजिन्य रोग, कर्करोग यांसारख्या आजारांवर उपचार करण्यात आले. देहू-आळंदी ते पंढरपूर या पालखी मार्गावर तात्पुरत्या उभारण्यात आलेल्या आपला दवाखान्यांच्या माध्यमातून लक्ष ६४ हजार वारक-यांना मोफत तपासणी व उपचार देण्यात आले.

सिकल सेल या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय सिकल सेल मिशन हे महत्त्वाकांक्षी अभियान हाती घेण्यात आलेले असून दिनांक १ जुलै २०१३ रोजी या अभियानाचा शुभारंभ देशाचे मा. पंतप्रधान यांच्या हस्ते संपन्न झालेला आहे. तरुणांमध्ये या आजाराविषयी जनजागृती करून त्यांना आजारापासून सुरक्षित करण्याचा प्रयत्न या अभियानाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्यानुसार आरोग्य संस्थामध्ये तपासणी मोहीम हाती घेण्यात आलेली आहे.

जुलै महिन्यात ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा करण्यात येतो. विविध प्रभावी माध्यमांचा उपयोग करून कुटुंब नियोजन पध्दतीचा प्रचार व प्रसार करण्याचा उद्देश यामागे आहे. पावसाळ्यामध्ये या विविध साथीच्या आजारांच्या पार्श्वभूमीवर सतर्क राहण्याच्या सूचना क्षेत्रीय आरोग्य यंत्रणांना देण्यात आल्या असून नागरिकांनी आजाराची लक्षणे दिसताच नजीकच्या शासकीय दवाखान्यात उपचार घ्यावेत, असे आवाहन मी या माध्यमातून करतो.

**श्री. धीरज कुमार**
आयुक्त, आरोग्य सेवा तथा
अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,
महाराष्ट्र राज्य

# संचालकांचे मनोगत



आरोग्य हा मानवाच्या जीवनातील एक महत्त्वाचा घटक असून, चांगले आरोग्य राखण्यासाठी प्रत्येकाने काळजी घ्यायला हवी. आरोग्य संपन्न राहण्यासाठी आपल्या दैनंदिन सवयी या आरोग्यदायी असणे आवश्यक आहे. यासाठी प्रतिबंधात्मक ज्ञान, स्वच्छता व आरोग्य सुविधांचा योग्य वापर याविषयी अधिक जागरूक असणे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

या धकाधकीच्या जीवनात असंसर्गजिन्य रोगांचा परिणाम मोठ्या प्रमाणावर पाहण्यास मिळतो आहे. त्यामुळे आता मधुमेह, उच्च रक्तदाब, स्तन कॅन्सर अशा विविध आजारांविषयी अधिक जागरूकता समाजामध्ये करणे आवश्यक झाले आहे. तसेच प्रत्येकाने आपली वैद्यकीय तपासणी करून घेणेही आवश्यक झाले आहे. आजाराला वेळीच अटकाव केला तर आपण गंभीर परिणामांना योग्य प्रकारे रोखू शकतो व प्रतिबंध करू शकतो. सार्वजिनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून विविध राष्ट्रीय कार्यक्रमांद्वारे मानसिक आरोग्य तसेच मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग याविषयी जिल्हा, तालुका व गाव पातळीपर्यंत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आरोग्यवर्धिनी केंद्राच्या माध्यमातून ही सेवा गावागावापर्यंत पोहोचते आहे. तसेच यामध्ये कार्य करणारे आशा परिचारिका, आशा सेविका, आरोग्य कर्मचारी हे घरोघरी जाऊन आपली सेवा देत आहेत.

शासनाच्या वतीने पुरविण्यात येणाऱ्या सेवा या दुर्गम व अति दुर्गम भागापर्यंत पोहोचविण्याचा शासनातर्फे प्रयत्न करण्यात येत आहे. यामुळे लोकांनाही आता आरोग्य सुविधा आपल्या जवळच्या ठिकाणी मिळणे सोयीचे झाले आहे. या सेवांची मागणी अधिक वृध्दिंगत करण्यासाठी आपण प्रत्येकाने उपलब्ध असणाऱ्या आरोग्य सेवांविषयी जनमानसात जनजागृती करणे आवश्यक झाले आहे. प्रत्येकाने टीमवर्कच्या माध्यमातून उपलब्ध असणाऱ्या सुविधा व पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य विषयक बाबींसाठी लोकांना सजग करून त्यासाठी लोक सहभाग मिळवणे आवश्यक आहे. शासनाच्या वतीने लोक सहभागासाठी व आरोग्य शिक्षणासाठी विविध माध्यमाच्या द्वारे जनजागृती करण्यात येत आहे. आता तर समाज माध्यमांद्वारे प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये आरोग्य विषयक माहिती सहज साध्य पोहचते. याविषयी सुध्दा काळजी घेण्यात येत आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून आरोग्य शिक्षण अधिक गतिमान करण्याकडे भर देण्यात येत असून त्याचा सामान्य माणसाला चांगला फायदा होत आहे हे विशेष. आपण सर्व मिळून सार्वजिनिक आरोग्य क्षेत्रातील सर्व कार्यक्रम जनमानसांत अधिक लोकाभिमुख करण्यासाठी प्रयत्न करू या व जनसामान्यांपर्यंत सक्षम आरोग्य सेवा पोहोचवू या.

**डॉ. स्वप्निल लाळे**
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.

# संचालकांचे मनोगत



सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने गेल्या वर्षभरात समाजोपयोगी अनेक आरोग्यविषयक उपक्रम व मोहिमा आखल्या गेल्या. या मोहिमांमध्ये सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून जास्तीत जास्त लोकांपर्यंत आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न करण्यात आले. यामध्ये 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' तसेच 'जागरूक पालक, सुदृढ बालक', 'सुंदर माझा दवाखाना', हिंदुदृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना', जन औषधी विषयक उपक्रम तसेच महाआरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे अशा विविध मोहिमांच्या द्वारे सामान्यांपर्यंत आरोग्य सेवा पुरविण्यामध्ये सार्वजनिक आरोग्य सेवेला चांगल्यापैकी यश मिळाले आहे.

आरोग्य विभागाच्या या यशामध्ये सर्वांचा सहभाग व सर्वांचे सहकार्य मोलाचे ठरले. या टीमवर्क भावनेमुळे सार्वजनिक आरोग्य सेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मदत झाली. याचा लाभ माता-भगिनी व गरजूंना झाला. सार्वजनिक आरोग्य सेवेत माता आरोग्य तसेच दूर दुर्गम भागासाठी विशेष उपक्रम सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने राबविले जातात. या उपक्रमांना अधिक बळकटी देण्याचे काम मागील वर्षात मोठ्या प्रमाणावर झाल्याचे आपल्या लक्षात येते. यामध्ये सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात काम करणा-या सर्वांचा सक्रिय सहभाग हा मोलाचा कणा होय. यामुळे सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम व अधिक लोकाभिमुख होण्यासाठी सर्वांचा सक्रिय सहभाग फार मोलाची आणि महत्त्वाची बाब आहे. राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणारे आरोग्य विषयक उपक्रम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचून सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र काम करूया व सुदृढ महाराष्ट्र घडविण्यामध्ये आपले सर्वांचे योगदान योगदान देऊया.

पावसाळा सुरू झाला असून पावसाळ्यामध्ये जलजन्य आजारांचा मोठ्या प्रमाणावर उद्रेक होण्याचा धोका असतो त्यामुळे या आजारावरही आपण प्रतिबंधात्मक उपयोग करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत जनजागृतीद्वारे आरोग्य शिक्षणासाठी आपण मदत कराल, ही आशा.

**डॉ. नितीन अंबाडेकर**
संचालक, आरोग्य सेवा, पुणे

# संपादकीय

आरोग्य सेवेत माहिती, शिक्षण आणि संवाद याला महत्त्वाचे स्थान असून कोणत्याही कार्यक्रमाला किंवा मोहिमेला लोकांपर्यंत व जनमानसात घेऊन जाण्यासाठी जनसंवाद हा महत्त्वाचा घटक आहे. या कार्यासाठी राज्य शासनाने राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाची स्थापना केली असून या विभागाच्या माध्यमातून आरोग्य शिक्षणाचे सर्व साहित्य तांत्रिक क्षमतेचा परिपूर्ण वापर करून आरोग्य सेवेत कार्यरत असणारे वैधकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी परिचारिका, आशा, स्वयंसेवी संस्था या सर्वांना सहज साध्य उपलब्ध करून दिले जाते. हे साहित्य प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी नावीन्यपूर्ण पध्दतीने प्रयत्न करण्यात आले आहेत. या प्रयत्नांना यश म्हणून समाज माध्यमाद्वारे दररोज किमान संदेश विविध उपक्रमांविषयी जनसामान्यांपर्यंत पोहोचविले जात आहेत व त्यास जनतेचा मोठा सहभाग मिळतो आहे. अत्यंत कमी खर्चात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी हा विभाग अधिक सक्षम असून आरोग्य सेवेतील घटकांचाही त्याला चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि गतिमान करण्यासाठी आरोग्य संवाद गतिमान होणे आवश्यक असल्यामुळे व सेवांची विश्वासार्हता व गुणवत्ता वाढविण्यासाठी जनसंवाद हा महत्त्वाचा धागा अधिक बळकट करणे विभागाला क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांना परवडेल अशा माध्यमाद्वारे मोहिमांचे प्रसारण होणे आवश्यकच बनले आहे. यासाठी विभागाने डिजिटल बुक, ब्लॉग, सोशल मीडिया हँडल्स अधयावत ठेवलेले असून याद्वारे रोजच्या रोज नवनवीन संदेश लोकांचे लक्ष वेधून घेतील अशा पध्दतीने मांडण्यात येत आहेत. या उपक्रमाला जनतेचा सहभाग लाभत आहे. याचाच अर्थ लोकांना या माध्यमाद्वारे संदेश दिल्यास तो अधिक प्रभावी व परवडेल अशा स्वरूपात देणे शक्य आहे. त्यामुळे या सुविधा अधिक सक्षम करणे आवश्यक बनले आहे. या सेवांना आरोग्य सेवेतील सर्व टीमची साथ मिळाल्यास अधिक गतिमान पध्दतीने आरोग्य संवाद होण्यासाठी व उपलब्ध सेवा सुविधांची माहिती व मोहिमांची माहिती जनसामान्यांपर्यंत जाण्यासाठी मोलाची मदत होणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सार्वजनिक आरोग्याच्या या हँडल्सला भेट देऊन जास्तीत जास्त लोकांपर्यंत आरोग्य योजना घेऊन जाण्यासाठी सक्रिय असले पाहिजे.

**डॉ. कैलास बाविस्कर**
संपादक

# मा. प्रा. डॉ. तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या नेतृत्वाखाली गेल्या वर्षभरातील आरोग्य विभागाची कामगिरी



# मा. वित्तमंत्री यांच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणातील सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित निर्णय/मुद्दे

## आशा स्वयंसेविकांच्या मोबदल्यात वाढ



दिनांक 1 एप्रिल 2023 पासून राज्यातील आशा व गटप्रवर्तकांना मोबदल्याबाबत रु. 1500/- इतकी वाढ करण्यात आलेली असून त्यानुसार आशांना एकत्रित रु .5000/- व गटप्रवर्तकांना एकत्रित रु. 6200/- मासिक मानधन राज्य शासनाकडून अदा करण्यात येत आहे.

## 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियान

सार्वजनिक आरोग्य विभागांमार्फत "माता सुरक्षित तर घर सुरक्षित" या विशेष अभियानांतर्गत राज्यात 18 वर्षावरील महिला, माता, गरोदर स्त्रीयांच्या सर्वांगीण तपासणीसाठी राबविलेल्या मोहिमेंतर्गत प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा आणि सुरक्षित व सुदृढ आरोग्यासाठी समूपदेशन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. या अभियानाअंतर्गत एकूण 4,39,24,100 लाभार्थ्यांची व 27,97,394 एकूण गरोदर मातांची तपासणी करण्यात आली. 2,68,889 मातांची सोनोग्राफी करण्यात आली. 74,08,117 लाभार्थ्यांना मानसिक आरोग्य, तंबाखू इ. बाबत समुपदेशन करण्यात आले

या मोहिमेच्या दुस-या टप्प्यात 313965 गरोदर मातांवर उपचार करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे मोहिमेच्या दुस-या टप्प्यामध्ये आत्तापर्यंत एकूण 52,294 लाभार्थ्यावर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया (लहान आणि मोठ्या) करण्यात आलेल्या आहेत.

माता सुरक्षित तर घर सुरक्षित



## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे विमा संरक्षण पाच लाख रुपये

MJPJAY

महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेत उपचारांची मर्यादा वार्षिक 1.50 लाखांवरुन 5 लाखांवर करण्यात आली आहे. तसेच या योजनेंतर्गत नवीन खासगी रुग्णालयांचा समावेशदेखील करण्यात आलेला आहे. मुत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियेचे प्रति कुटुंब प्रति वर्ष रु. 2.50 लक्ष विमा संरक्षण मर्यादित रु. 4.50 लक्ष पर्यंत वाढ करण्यात आली आहे. सर्वसामान्य रुग्णांसाठी ही मोठी घोषणा असून त्याचा फायदा मोठ्या प्रमाणावरील पात्र लाभार्थ्यांना मिळणार आहे.

## मानसिक अस्वास्थ्य व नवीन व्यसनमुक्ती केंद्रे कार्यान्वित

मानसिक अस्वास्थ्य आणि व्यसनाधिनतेची वाढती समस्या लक्षात घेता जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे नवीन व्यसनमुक्ती केंद्र कार्यान्वित करण्याची कार्यवाही करण्यात येत असून त्यांच्या बांधकामासाठीचे अनुदान जिल्ह्यांना वितरित करण्यात आलेले आहे. तसेच ठाणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीचे NIMHANS बेंगलुरुच्या धर्तीवर पुनर्निर्माण करण्याची व कोल्हापूर येथे 365 खाटांचे नवीन मनोरुग्णालय उभारण्याची प्रक्रियादेखील सुरु झालेली आहे. यासाठी 850 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.





## 'आभा' कार्डचे राज्यस्तरीय लोकार्पण

आयुष्यमान भारत डिजिटल अभियान (ABDM) या योजनेची सुरुवात मा. पंतप्रधान यांच्या संकल्पनेतून करण्यात आली व याद्वारे सर्व नागरिकांना सुरक्षित, सर्वसमावेशक, परवडणारी पायाभूत आरोग्य सुविधा डिजिटल स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या डिजिटल माध्यमाद्वारे आरोग्य विषयक डेटा बेस तयार करून, सर्व आरोग्य सुविधा नागरिकांना सहजपणे उपलब्ध होतील.

आभा कार्ड हे एक प्रकारे नागरिकांची आरोग्य कुंडली असेल. त्यामुळे आरोग्यविषयक माहिती समजू शकेल व पुढील उपचारासाठी व सरकारी योजनांसाठी त्याचा रुग्णाला फायदा होईल. यासाठी आभा कार्ड लोकार्पण सोहळा दि. 04.10. 2022 रोजी त्रिमूर्ति प्रांगण, मंत्रालय, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री, मा उपमुख्यमंत्री व आरोग्यमंत्री केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री व आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात आला.

केवळ दोन महिन्यात दि. 20.10.2022 ते 10.12.2022 या कालावधी मध्ये 18 लाखहून अधिक जनतेची आभा नोंदणी करण्यात आली. आजपर्यंत राज्यात सुमारे 2 कोटी जनतेचे आभा कार्ड बनविण्यात आले आणि यासाठी वाराणसी येथे सर्वोच्च कामगिरी करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राला गौरविण्यात आले आहे.

## परांडा येथे 'महाआरोग्य शिबीर'




ग्रामीण जनतेला महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी परांडा येथे जनतेच्या सहभागाने दि. 27 व 28 नोव्हेंबर रोजी महाआरोग्य शिबिर घेण्यात आले. या शिबिरात 2,48,855 पेक्षा जास्त लाभार्थ्यांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले. या संदर्भित रुग्णांपैकी 6 नेत्र व 90 रुग्णांना श्रवण यंत्र वाटप करण्यात आले. 172 दंत उपचार व 89 रुग्णांवर दंतशास्त्रीय करण्यात आल्या. संशयित 17 रुग्णांच्या तपासणी करून तीन रुग्णांची बायोप्सी करण्यात आली. हृदयविकाराच्या 111 रुग्णांना संदर्भित करण्यात येऊन सतरा रुग्णांवर एन्जिओग्राफी, पाच रुग्णांवर एन्जोप्लास्टी, तीन रुग्णांवर एसडी शस्त्रक्रिया करण्यात आली. चाळीस महिला रुग्णांवर शस्त्रक्रिया तसेच एमआरआय, हाडाची तपासणी, निदान व उपचार सेवा देण्यात आल्या.

या शिबिरात रुग्णांना येण्या-जाण्यासाठी वाहन जेवणाची व्यवस्था करण्यात आली तसेच शासकीय व खाजगी डॉक्टरांचा मोठा सहभाग घेऊन आरोग्य सेवेतील तंत्रज्ञ कर्मचारी यांचा मोठा सहभाग घेण्यात आला व हे शिबिर यशस्वी संपन्न झाले. या शिबिराची नोंद गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये घेण्यात आली आहे.

## 'एक व्यक्ती - एक पद' योजनेची अंमलबजावणी



राज्यात आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी 'एक व्यक्ती - एक पद' योजना राबविण्यात आली आहे. ज्या व्यक्तींकडे अनेक पदांची जबाबदारी होती, ती विभागून अनेक व्यक्तींना संधी देण्यात आली. एका व्यक्तीकडे एका पदाचे कार्य सोपविण्यात आले. त्यामुळे कार्याला गती प्राप्त होत आहे.

# राज्यातील शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ऑनलाईन पोर्टलव्दारे बदल्या



सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत यंदा प्रथमच ऑनलाईन पध्दतीने अधिका-यांच्या प्रशासकीय बदल्या करण्याच्या केलेल्या महात्वाकांक्षी निर्णयाचा लाभ बहुतांश अधिका-यांना मिळालेला असुन त्यांना त्यांच्या अपेक्षित ठिकाणी बदलीने पदस्थापना मिळालेली आहे. या प्रक्रियेमुळे बदली प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता व अचूकता आलेली आहे.

# 'महारक्तदान' शिबिराचे आयोजन

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. त्यामुळे रक्ताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. थैलेसिमिया हिमोफिलिया सिकलसेल व इतर रक्ताची निगडित आजारासाठी वारंवार रक्त लागते. नेहमीच रक्तदाते व रक्तदान शिबिर आयोजक यांच्या सहकार्यामुळे महाराष्ट्रात स्वैच्छिक रक्तदानाची चळवळ चांगल्या प्रकारे रुजवली जात आहे. देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 18,00,019 युनिट रक्त संकलन करण्यात आले.

तसेच महारक्तदान शिबीराअंतर्गत दिनांक 9 फेब्रुवारी रोजी माननीय मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात स्वैच्छिक रक्तदान शिबिरात 538 रक्तकेंद्र सहभागी झाले. या रक्तदान महायज्ञात एकाच दिवशी राज्यात 10098 युनिट्स रक्त संकलित करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यात रक्त संक्रमण सेवेसाठी सद्यस्थितीत 366 रक्त केंद्र कार्यरत आहेत. एवढया मोठ्या प्रमाणात रक्त सेवेच्या पायाभुत सुविधा व जाळे असणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे.

जागतीक आरोग्य संघटनेच्या निकषाप्रमाणे लोकसंख्येच्या 1 टक्का इतके रक्तसंकलन अपेक्षित आहे. तथापी आपल्या राज्याची ही टक्केवारी ही 1.5 एवढी आहे. त्यानुसार देशामध्ये आपल्या राज्याचे रक्तसंकलन अव्वल क्रमांकावर आहे.

रक्तदान अमूल्यदान



# महाआरोग्य शिबिर

## महाआरोग्य शिबिर

माननीय मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त ( 9 फेब्रुवारी 2023 रोजी ) राज्यभरात जिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र या संस्थांच्या ठिकाणी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये प्राथमिक आरोग्य तपासण्या, मोफत रक्त चाचण्या, आभाकार्ड नोंदणी, आवश्यकतेनुसार संदर्भसेवा देण्यात आली. कन्सल्टेशन तज्ञ व आयुर्वेद सेवाही पुरविण्यात आल्या. राज्यभरात 3005 महाआरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले व एकाच दिवसात तीन लाख 70 हजार 911 रुग्णांची तपासणी करण्यात आली.







## 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना'

राज्यात 700 ठिकाणी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. आजवर 317 आपला दवाखाने कार्यान्वित करण्यात आलेले असून 1 मे 2023 पासून आजवर एकूण 157148 रुग्णांनी, 3519 गरोदर मातांनी या सेवेचा लाभ घेतलेला आहे. तसेच 22392 प्रयोगशाळा चाचण्या या दवाखान्यांमध्ये करण्यात आलेल्या आहेत.





## शासकीय जिल्हा रुग्णालये व विविध आरोग्य संस्थांची बांधकामे

जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे येथील 900 खाटांच्या नवीन इमारतीचे व जिल्हा सामान्य रुग्णालय, पालघर येथील 200 खाटांच्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानामधील निधीमधून विविध आरोग्य संस्थाच्या बांधकामाची 171 कामे मंजूर करण्यात आलेली असून सदर कामेदेखील लवकरच हाती घेण्यात येणार आहेत.



## 'जागरुक पालक - सुदृढ बालक' अभियान

राज्यातील 0 ते 18 वर्षापर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागअंतर्गत 'जागरुक पालक, सुदृढ बालक' हे अभियान राज्यभर राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सर्व शासकीय व निम-शासकीय शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, आश्रमशाळा, अंगणवाड्या, बालगृहे, बालसुधारगृहे, अनाथालये, समाजकल्याण व आदिवासी विभाग वसतिगृहे मुले, मुली, खाजगी नर्सरी, बालवाड्या, खासगी शाळा व खासगी कनिष्ठ महाविद्यालये, शाळा बाह्य मुलांची आरोग्य तपासणी, उपचार व संदर्भ सेवा पुरविण्यात येत असून आजवर एकूण 96,939 शाळा व 98,350 अंगणवाडीमध्ये एकूण 2,18,40,561 बालकांची तपासणी करण्यात आली आहे.







## 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार'



वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती जागृत ठेवून समाजकार्याचा यथोचित गौरव करण्याच्या दृष्टीने तत्कालीन आरोग्य मंत्री व सध्याचे मुख्यमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदे यांचे संकल्पनेतून आरोग्य विभागाकडून या योजनेला सुरुवात केली गेली. उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस आणि आरोग्य मंत्री मा. डॉ. तानाजी सावंत यांच्या पुढाकाराने योजना साकार करण्यात आली. या योजनेअंतर्गत आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट उल्लेखनीय काम करणाऱ्या एक स्वयंसेवी संस्था (NGO), तीन डॉक्टर, एक पत्रकार तसेच पाच आरोग्य कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.पुरस्काराचे स्वरुप प्रत्येकी 1 लाख व प्रशस्तीपत्र आणि स्मृतिचिन्ह दिले जाते. 23 जानेवारी 2023 रोजी रंगशारदा सभागृह येथे मा. मुख्यमंत्री व आरोग्य मंत्री व लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

## लिथोट्रीप्सी उपचार

राज्यातील रुग्णांना किडनी स्टोन या आजारावर अत्याधुनिक उपचार मिळावेत यासाठी 200 खाटांच्या सर्व रुग्णालयांमध्ये येत्या तीन वर्षात ही उपचार सेवा सुरु करण्यात येणार आहे. या वर्षी सहा जिल्ह्यात या सेवा उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



## कर्करोगावरील किमोथेरपी – डे केअर सेंटर



महाराष्ट्रमध्ये अंदाजे 1.2 लाख व्यक्ती कर्करोग बाधित आहेत. रोगावरील उपचार महाग असल्यामुळे गरीब, ग्रामीण भागातील रुग्ण उपचार घेत नाहीत किंवा अर्धवट सोडतात. त्यामुळे 34 जिल्ह्यांमध्ये सार्वजनिक आरोग्य रुग्णालय स्तरावर ही केंद्रे सुरु करण्यात येत आहेत.

## आरोग्य सेवेत देशात महाराष्ट्र अग्रेसर

आरोग्य सेवेत देशात महाराष्ट्र अग्रेसर असून राज्याला राष्ट्रीय स्तरावरुन माता मृत्यू कमी करण्यासाठी द्वितीय पुरस्कार, लक्ष्य संस्था प्रमाणिकीकरणासाठी द्वितीय पुरस्कार, उत्कृष्ट काम केलेल्या आशा परिचरिका यांना द्वितीय पुरस्कार व किशोरवयीन शाळाबाह्य मुलींचे रक्तक्षयाचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रथम पुरस्कार असे विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

## ‘मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र अभियान’



मोतिबिंदू हे अंधत्वाचे प्रमुख कारण आहे व शस्त्रक्रिया हा त्यावर एकमेव उपाय आहे. मोतिबिंदू तज्ज्ञांचा अनुशेष पूर्णपणे भरुन काढण्यासाठी तीन वर्षात 27 लक्ष मोतिबिंदू शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. 87 शासकीय व 81 अशासकीय स्वयंसेवी संस्थामध्ये विशेषज्ञ सेवेसह शस्त्रक्रियागृह उपलब्ध आहेत. यांच्या माध्यमातून मोतिबिंदू मुक्त महाराष्ट्र अभियान राबविण्यात येणार आहे.

## हृदयरोग रुग्णांसाठी कार्डिया कॅथलॅब

हृदयरोग हे मृत्यूचे महत्त्वाचे कारण आहे. 12 जिल्ह्यांमध्ये स्टेमी प्रकल्प राबविण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने 15 कार्डिया कॅथलॅबची स्थापना करुन जनतेला स्वस्त दरात सेवा उपलब्ध करुन देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे.



## कॅन्सर व्हॅन




आरोग्य विभागामार्फत नियमितपणे सर्वेक्षणाद्वारे संशयित कर्करुग्ण शोधले जातात. अशा रुग्णांसाठी बायोप्सी करणे आवश्यक असते. यासाठी आठ फिरत्या कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

## ठाणे येथे अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्युरोसायन्सेस यांच्या धर्तीवर अत्याधुनिक मनोरुग्णालय बांधण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये 3100 खाटा, अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह, अतिदक्षता विभाग, संशोधन विभाग, प्रशिक्षण विभाग, क्रीडा विभाग, योगा व मनन चिंतन या सेवांचा समावेश असणार आहे. याचप्रमाणे कोल्हापूर येथेही प्रादेशिक मनोरुग्णालय स्थापन करण्यात येणार आहे.





## महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाची स्थापना



राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग यांच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांकरिता आवश्यक असणा-या औषधे, औषधी साहित्य तसेच यंत्रसामुग्री व उपकरणे यांची खरेदी एकाच ठिकाणी करण्यासाठी “महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण” हे स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. त्याव्यतिरिक्त इतर विभाग, स्वायत्त संस्था, महानगरपालिका, खाजगी आस्थापना, इत्यादी यांनी मागणी नोंदविल्यास त्यांच्याकरिता आवश्यक औषधे, औषधी साहित्य तसेच यंत्रसामुग्री व उपकरणे यांची खरेदी करुन देण्याची कार्यवाही प्रस्तुत प्राधिकरण करुन देणार आहे. अशा प्रकारचे “महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण” स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशात पहिले राज्य ठरले आहे.

## चार जिल्ह्यांमध्ये ३० खाटांच्या आयुष रुग्णालयांची निर्मिती



राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत राज्यामध्ये 30 खाटांचे आयुष रुग्णालय पुणे, अहमदनगर, नंदुरबार, सिंधुदुर्ग या चार जिल्हयांमध्ये प्रस्तावित असुन मागील वर्षात पुणे, अहमदनगर व नंदुरबार येथील आयुष रुग्णालयाचे बहुतांश बांधकाम पूर्ण झाले आहे. सिंधुदुर्ग येथील आयुष रुग्णालयाचे बांधकाम सुरु असून अद्यापपर्यंत 65% बांधकाम पुंर्ण झालेले आहे. लवकरच ही चारही रुग्णालये रुग्णसेवेत दाखल होतील.

## धाराशिवला आशियातील पहिले 'फिरते मल्टीस्पेशालिटी रुग्णालय'

मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यात आरोग्य मंत्री मा. डॉ. तानाजी सावंत यांच्या प्रयत्नातून आशियातील पहिले 'फिरते मल्टीस्पेशालिटी रुग्णालय' सुरु करण्यात आले असून, नीती आयोगाच्या प्रकल्पातून हे नावीन्यपूर्ण फिरते रुग्णालय जनतेच्या आरोग्य सेवेसाठी तयार करण्यात आले आहे. फिरत्या मल्टीस्पेशालिस्ट रुग्णालयामुळे आरोग्याचा हा रथ धाराशिव जिल्ह्यातील जनतेसाठी वरदान ठरणार आहे.



'आरोग्य रथ' म्हणून या फिरत्या रुग्णालयाची मल्टीस्पेशालिटीनुसार रचना करण्यात आली असून आशिया खंडातील या प्रकारचे हे पहिले रुग्णालय ठरले आहे. 25 फूट लांब व दोन्ही बाजूला विस्तार होईल अशा प्रकारे या रुग्णालयाची रचना असून या रुग्णालयात वातानुकूलित व्यवस्था, छोट्या शस्त्रक्रिया, अत्याधुनिक तपासण्यांसाठी रुग्णांना खाटा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. फिरते रुग्णालय मल्टीस्पेशालिटी रुग्णालयासारखे विस्तारित असून गावागावांमध्ये जाऊन आरोग्य सेवा देण्यासाठी याची रचना करण्यात आली आहे. ग्रामीण भागात मल्टीस्पेशालिटी सुविधांची गरज असल्यामुळे अशा नावीन्यपूर्ण रुग्णालयाच्या माध्यमातून आरोग्य सेवा देण्यासाठी आरोग्य मंत्री यांनी पुढाकार घेऊन ही सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. 25 फूट लांब व 450 स्क्वेअर फुट एरिया कव्हर करणारे हे रुग्णालय ग्रामीण भागासाठी वरदान ठरेल. ज्या ठिकाणी सुविधा उपलब्ध नाही, त्या ठिकाणी हे फिरते मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल सुविधा देईल आणि हे पूर्णपणे ऑटोमेटेड हॉस्पिटल असणार आहे. या फिरत्या रुग्णालयात एक डॉक्टर, एक तंत्रज्ञ, डाटा एन्ट्री ऑपरेटर, नर्स, ड्रायव्हर, सहाय्यक फार्मासिस्ट, रेडिओलॉजी टेक्निशियन सुविधा देणार आहेत, तसेच टेलीमेडिसीन सुविधाही यात असणार आहे, जेणेकरुन तज्ज्ञ डॉक्टरांची सेवाही याद्वारे रुग्णांना उपलब्ध होऊ शकेल. तपासणीनंतर जवळच्या शासकीय रुग्णालयात सुविधा पुरवण्यासाठीही पाठविले जाऊ शकते. विस्तारित प्रयोगशाळा, ऑटोमॅटिक पद्धतीने तपासण्या, त्वरित औषध अहवाल देण्याची सुविधा यामध्ये असणार आहेत. फिरत्या रुग्णालयात फार्मसी व 100 प्रकारच्या औषधांचा साठाही उपलब्ध असणार आहे.



## सुंदर माझा दवाखाना



राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री मा. प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून, तसेच मा. संजय खंदारे, प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मा. धीरज कुमार, आयुक्त, आरोग्य सेवा यांच्या पुढाकाराने राज्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी 'स्वच्छता दिवस' पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याला राज्यात सर्वत्र चांगला प्रतिसाद मिळाला.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व दवाखाने आणि आरोग्य केंद्रांमध्ये प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी सर्वांगीण स्वच्छता करण्यात यावी, असे आदेश आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक धीरज कुमार यांनी दिले आहे. प्रथम मोहीम 4 फेब्रुवारी 2023 रोजी घेण्यात आली असून नंतर दरमहा प्रथम शनिवारी 'स्वच्छता दिवस' पाळण्यात येतो.

जागतिक आरोग्य दिन 7 एप्रिल ते 14 एप्रिल कालावधीत स्वच्छता विषयक बाबींकडे लक्ष वेधून दवाखाना स्वच्छ व सुंदर राहावा त्यासाठी उपक्रम राबविण्यात आला त्यास चांगला प्रतिसाद मिळाला

## मिशन मेळघाट

मेळघाटातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि आदिवासी पाड्याला आरोग्य मंत्री मा. प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी भेट देऊन कुपोषण, बालमृत्यू तसेच माता मृत्यू कमी करण्याबाबत उपाययोजना आखण्याचे आदेश दिले आहेत. मेळघाटातील आरोग्य केंद्रातील रिक्त कर्मचाऱ्यांची पदे त्वरित भरण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. मेळघाटात 16 अतिरिक्त रुग्णवाहिका तसेच 2 नवजात रुग्णवाहिका नव्याने कार्यरत. करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे 2 वैद्यकीय फिरती पथके तसेच सीटी स्कॅन मशीन कार्यान्वित करण्यात आले आहे.






## ‘माता सुरक्षित तर घर सुरक्षित’ अभियान





## वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व 'जागरूक पालक-सुदृढ बालक' अभियान





## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना





## जन औषधी दिवस २०२३







ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आयुष्मान भारत डिजिटल हेल्थ (आभा) कार्डचे वितरण करण्यात आले.























महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून 1 मे 2023 रोजी मा.मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते राज्यातील प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे 317 "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना"चे डिजिटल अनावरण करण्यात आले. सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव-2 श्री. नवीन सोना, आयुक्त श्री. धीरज कुमार यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री जन औषधी दिन आणि जागतिक महिला दिनानिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे 8 मार्च 2023 रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते ग्रामीण भागात जनऔषधी केंद्रांचे डिजिटली अनावरण करण्यात आले आणि त्यांच्याशी दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधण्यात आला.











सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने महाआरोग्य फिल्म फेस्टिवल 2022-23 चे आयोजन आणि पारितोषिक वितरण समारंभ बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. विजेत्यांना आरोग्य मंत्री मा. प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या हस्ते पारितोषिक, स्मृतिचिन्ह तसेच रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. श्री. धीरज कुमार. आयुक्त, आरोग्य सेवा,
डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक, आरोग्य सेवा, पुणे, ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यावेळी उपस्थित होते.






# जागतिक लोकसंख्या दिन

दरवर्षी 11 जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. सध्या लोकसंख्या वाढ हा सार्वजनिक स्तरावरील अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे मानवी संख्या दरवर्षी अनेक पटीने वाढत आहे. आपल्या भविष्याला वाचविण्यासाठी आणि आपले भविष्य सुखकर होण्यासाठी वाढती लोकसंख्या नियंत्रणात राहणे अतिशय महत्त्वाचे आहे.

आपल्या पर्यावरणात नैसर्गिक संसाधने मर्यादित आहेत, पण त्याचा वापर दरवर्षी खूप मोठ्या प्रमाणात होतो आणि त्याचा संसाधनांवर ताण येतो. ही वस्तुस्थिती लक्षात घेता एक दिवस असा असेल जेव्हा ही संसाधने संपतील आणि तेव्हा माणसांना जगणे सुद्धा खूप अवघड होईल. आजच्या घडीला भारतात बेरोजगारी हा विषय अत्यंत ज्वलंत आहे. लोकसंख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढल्याने बरेच लोक रोजगार किंवा नोकरीच्या शोधासाठी वेगवेगळ्या शहरांकडे जाऊ लागले. रोजगाराच्या अभावामुळे विषमता आणि दारिद्र्य वाढवून सामाजिक शांतता भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आणि सतत वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे ही समस्या पुढे जाऊन विक्राल रुप घेऊ शकते. आणि त्याच बरोबर गरिबीमध्येही वाढ झालेली दिसून येईल. त्याचप्रमाणे वाडत्या लोकसंख्येचा पर्यावरणावर ही खूप मोठ्या प्रमाणात आघात होताना दिसतो. त्यामुळे औद्योगिकरणात वाढ झाली आणि त्यातून होणाऱ्या प्रदूषणामुळे बहुसंख्य लोकसंख्येमध्ये अधिक आरोग्य विषयीच्या समस्या निर्माण झाल्या. वाढत्या लोकसंख्येमुळे साथीचे रोग पसरत आहेत आणि आरोग्याच्या सोयी-सुविधा ही अपुऱ्या पडताना दिसत आहेत.



आज लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे ही काळाची गरज आहे. वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी ती करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे जन्मदर कमी करणे, लोकांना जन्म नियंत्रण पद्धतीचा स्वीकार करण्यास शिक्षित करणे आणि प्रजनन दर कमी करण्यासाठी स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढवणे गरजेचे आहे. तसेच नागरिकांना कुटुंब नियोजनाचे महत्व समजावून सांगितले पाहिजे आणि बालविवाहवर बंदी घालणे स्त्री व पुरुष दोघांसाठी लग्नाचे वय वाढवणे हे खूप गरजेचे आहे. वाढती लोकसंख्या ही भारतातील गंभीर समस्या आहे आणि याच लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत सरकारने विविध उपाययोजना आणि उपक्रम हाती घेतले आहेत. कुटुंब नियोजन कामगारांना प्रशिक्षित करण्यासाठी विविध प्रशिक्षण संस्था आणि प्रशिक्षण केंद्र स्थापन केली आहेत, ही आरोग्य केंद्र गर्भनिरोधकांसाठी विविध उपकरणे, लसीकरण आणि इतर आरोग्य सेवा पुरवतात.

भारत सरकार हे त्यांच्या परीने अथक प्रयत्न करत आहेतच; पण देशातील लोकसंख्या वाढीची समस्या अधिक धोकादायक होऊ नये आणि आपल्याला भविष्यात कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे नैसर्गिक साधन संपत्तीला धक्का लागला किंवा निसर्ग संपदा धोक्यात आली तर निसर्ग आपत्तीला आपण सामोरे जाण्याची वेळ फार दूर असणार नाही. म्हणूनच 'छोटे कुटुंब, सुखी कुटुंब' या ब्रीदवाक्याचे कटाक्षाने पालन करायला हवे.

**लोकसंख्येचे आव्हान पेलू या, छोट्या कुटुंबातून भविष्य घडवू या!!**

# पावसाळ्यात घ्यावयाची काळजी

## काय करावे ?

पाणी कमीत कमी 10 मिनिटे उकळून गाळावे व हे शक्य नसल्यास द्रव क्लोरीन टाकून प्यावे.

लेप्टो टाळण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार डॉक्सीसायकलीन औषध घ्यावे.

उलटी, जुलाब, ताप इ. लक्षणे आढळल्यास त्वरित औषधोपचार घ्यावा.

शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुवा.

बाळाला जुलाब झाल्यास क्षार संजीवनीचा वापर करा.

पाणी साचल्यास निचरा करून परिसर स्वच्छ ठेवावा.

हातापायाला जखम झाल्यास जंतुविरोधी मलम लावा

डासांची उत्पत्ती स्थाने नष्ट करा...

वैयक्तिक स्वच्छता राखावी.

ताप येताच वैद्यकीय सल्ला घ्या.

## हे लक्षात ठेवा

कोणताही ताप अंगावर काढू नका.

उघड्यावरचे अन्नपदार्थ खाण्याचे टाळा.

शिळे अन्न, खराब झालेली अथवा कापून  ठेवलेली फळे खाऊ नका.



# आरोग्य विभागातील चार वरिष्ठ अधिकारी सेवानिवृत्त

गेल्या महिन्यात आरोग्य विभागातील तब्बल 4 वरिष्ठ अधिकारी सेवानिवृत्त झाले. हे सर्व अधिकारी विभागात अत्यंत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत होते. त्यांच्या निवृत्तीने विभागात नक्कीच एक पोकळी निर्माण झाली आहे यात शंका नाही. या अधिकाऱ्यांच्या योगदानाबद्दल थोडेसे....

**डॉ. दुर्गादास पांडे, सहसंचालक, आरोग्य सेवा**

कोल्हापूरला आरोग्य सेवा उपसंचालक पदावर कार्यरत असणारे डॉ दुर्गादास पांडे सहा महिन्यांपूर्वीच आयुक्तालयात बदलीने सहसंचालक (प्राथमिक आरोग्य केंद्रे) पदावर रुजू झाले. अत्यंत सुस्वभावी, हुशार, अभ्यासू, अनुभवी आणि नेहमीच हसतमुख अशा डॉ पांडे सरांनी कार्यालयात अगदी कमी काळात आपली वेगळी ओळख निर्माण केली. राज्यस्तरावर काम करताना त्यांचा नवखेपणा कधी जाणवला नाही. सह अधिकारी व कर्मचाऱ्यांशी सौहार्दपूर्ण व खेळीमेळीच्या वागणुकीमुळे त्यांच्या उपस्थितीत कामाचा तणाव कधी कुणास जाणवला नाही. जितक्या तळमळीने त्यांनी आपल्या विषयाचे कामकाज केले तितक्याच आपलेपणाने त्यांनी कार्यालयातील त्रुटींवर बोटदेखील ठेवले. त्यामुळेच त्यांचा हा रोखठोकपणा खूप भावला. त्यांची सेवानिवृत्ती विभागाला एका ध्येयवादी व उपक्रमशील व्यक्तिमत्वापासून दुरावणारी ठरली.

**डॉ. अरुण दिनकरराव यादव, सहाय्यक संचालक, मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा**

डॉ अरुण दिनकरराव यादव. आरोग्य विभागातील मला भावलेल्या अधिकाऱ्यांपैकी एक संवेदनशील अधिकारी. मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्याच्या अंमलबजावणीत सेवेचा बहुतांश काळ घालवलेले डॉ यादव, सहाय्यक संचालक पदावरून आयुक्तालयातून सेवानिवृत्त झाले. कार्यालयातील बहुतांश अधिकारी कर्मचाऱ्यांच्या व नातलगांच्या वैद्यकीय उपचारांमध्ये सदैव मदतीला धावून जाणारे अधिकारी म्हणूनदेखील ते परिचित आहेत. कामकाजात आपली भूमिका कुठलीही तडजोड मान्य न करता ठामपणे मांडणाऱ्या डॉ यादव सरांनी आपल्या भूमिकेसाठी अनेकदा वरिष्ठांची नाराजीही पत्करली. होटा कायद्याच्या सर्व बारीकसारीक खाचाखोणा माहीत असलेल्या डॉ यादव यांच्या निवृत्तीने या विभागात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. राज्यातील जिल्हा रुग्णालये, महिला रुग्णालयांसह मुंबईतील काही मोठ्या रुग्णालयांत महत्वाच्या पदावर काम केलेले डॉ यादव हे कान नाक घसा चे विशेषज्ञ. उत्तम प्रशासक म्हणूनदेखील त्यांनी आपली छाप पाडली आहे. मूळचे कोल्हापूरचे असलेल्या डॉ यादव यांना पत्नीच्या निधनानंतर मोठ्या कौटुंबिक समस्यांचा सामना करावा लागला. मात्र अत्यंत संघर्षमय जीवन व्यतीत केलेल्या डॉ यादव सरांनी व्यक्तिगत आयुष्याचा कुठलाही परिणाम कार्यालयीन कामकाजात जाणवू दिला नाही. वैचारिक समानतेच्या निकषावर मला त्यांच्या सर्वाधिक सानिध्याचा लाभ घेता आला हे माझे भाग्यच आहे. त्यांच्या जमेच्या फिलॉसॉपी, पॉलिटिक्स, सामाजिक, जातीयता आदी विषयांशी निगडित धोरणांवर आम्ही कित्येक काळ चर्चा करत बसायचो. नागपूर येथे अधिवेशन काळात या चर्चांना अधिकच रंग चढायचा. माझ्या व्यक्तिगत आयुष्यात डॉ यादव सरांचे मार्गदर्शन व केलेली मदत विसरता येणार नाही. नातेवाईकांच्या, ओळखीतल्या स्वकीयांच्या आजारपणात ते आपल्या ओळखीचा पुरेपूर वापर करुन सदैव मदतीसाठी ठामपणे उभे राहायचे. डॉ डी वाय पाटील रुग्णालयात आजीच्या शस्त्रक्रियेवेळी ते स्वतः सकाळपासुन सोबत होते ही आठवण न विसरता येणारी आहे. त्यामुळे आज ते सेवानिवृत्त झाले असले तरी त्यांच्यासोबतचे ऋणानुबंध आयुष्यात कधीही संपू शकत नाहीत. त्यांना सुखी व निरोगी जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा..






**डॉ. एकनाथ माले, सहसंचालक, आरोग्य सेवा**

डॉ. एकनाथ माले सर लातूर उपसंचालक पदावरुन आरोग्य सेवा आयुक्तालयात उपसंचालक पदावर रुजू झालेले आणखी एक हरहुन्नरी व हजरजबाबी अधिकारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. दमदार व आत्मविश्वासाने भरलेले बोलणे, विषयाला अभ्यासपूर्ण व ठामपणे मांडण्याची पद्धत आणि ऍलोपॅथीचे डॉक्टर असूनही आयुर्वेद, योग, आयुष यासारख्या विषयांना आपल्या कारकिर्दीत न्याय देण्याचा अट्टाहास करणाऱ्या डॉ माले सरांची विभागातील दीर्घ कारकीर्द खऱ्या अर्थाने त्यांचे अष्टपैलूत्व सिद्ध करणारी ठरली. सभा, बैठका, कार्यशाळा, कार्यक्रमांतून आपल्या ओघवत्या, ठणठणीत आवाजात ते एक वेगळी छाप सोडायचे. एखाद्या विषयाबद्दल सविस्तर माहिती देताना अनेकदा त्यांना मिळालेला वेळही अपुरा पडायचा व आवरते घ्यावे लागायचे. खरेतर त्यांची ही तळमळ आरोग्य सेवेबाबत त्यांची संवेदनशीलता दर्शवणारी होती. आयुक्तालयात त्यांनी आपल्यावर सोपवलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियान, असंसर्गजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम, आयुष यासारख्या महत्वपूर्ण विषयांची जबाबदारी पूर्ण क्षमतेने निभावली. मलादेखील लिखाण, कामकाज व व्यक्तीगत आयुष्याबाबत ते अनेक मोलाच्या टिप्स द्यायचे. त्यांची विभागातील प्रदीर्घ सेवा व दांडगा अनुभव त्यांची आरोग्य सेवेसाठी परिणामकारकता व उपयुक्तता सिद्ध करणारी होती एव्हढे नक्की.

**सौ. सुवर्णा मुरंजन, प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा**

आरोग्य सेवा आयुक्तालयात प्रशासकीय अधिकारी पदावर कार्यरत असणाऱ्या एक उत्तम, अभ्यासू अधिकारी सौ सुवर्णा मुरंजन ह्यादेखील 37 वर्षाहून अधिक काळ शासकीय सेवा बजावून सेवानिवृत्त झाल्या. राज्यातील विविध आरोग्य संस्थांमध्ये कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या आस्थापनाविषयक बाबींमध्ये त्यांचा हातखंडा होता. त्यांच्यावर सोपवलेल्या कुठल्याही विषयाची माहिती त्यांच्याकडे तात्काळ उपलब्ध असायची. शासन निर्णय, नियम, कार्यप्रणाली, मार्गदर्शिका यांबाबत त्यांना खडानखडा माहिती असल्यामुळे मा आयुक्त सरदेखील त्यांचा उल्लेख 'एनसायक्लोपीडिया' म्हणून करायचे. सहकारी व वरिष्ठांशी त्यांचे अत्यंत कणखर, हजरजबाबी, ठाम परंतु सौहार्दपूर्ण संभाषण त्यांच्यातील एका जबाबदार अधिकाऱ्याची जाणीव करुन देणारे होते. मलादेखील कामकाजात उद्भवणाऱ्या अनेक अडचणींवर त्यांचेकडे तात्काळ सल्ला व मार्ग उपलब्ध असायचा. त्यांच्याशी बोलताना सदैव सकारात्मकता जाणवायची. हवी असलेली माहिती तात्काळ व अपेक्षेपेक्षा कमी कालवधीत उपलब्ध करुन देणाऱ्या अधिकारी म्हणून मी मुरंजन मॅडमचा उल्लेख करीन. कामकाजात जितक्या त्या कर्तव्यदक्ष होत्या तितक्याच त्या कुटुंबवत्सल देखील आहेत. कामाव्यतिरिक्त विविध सामाजिक विषयांवर त्यांच्यासोबत गप्पा मारताना कामाचा ताण हलका झाल्यासारखे वाटायचे. त्यांच्या निवृत्तीने कार्यालय व आस्थापना विभागात अनुभवी व अभ्यासू अधिकाऱ्याची उणीव निश्चितच जाणवत राहील.

**- वैभव मोहन पाटील**

कक्ष अधिकारी, अभियान संचालक कक्ष, मुंबई








# सार्वजनिक आरोग्य विभागाची दमदार कामगिरी!!!

## पालखी मार्ग आणि पंढरपूर महाआरोग्य शिबिरांमध्ये एकूण

## ११,६४,६८४

## वारक-यांना मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात आली.




आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे जमलेल्या वारकऱ्यांची आरोग्य तपासणी आणि त्यांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी दि. २७ ते २९ जून २०२३ दरम्यान ३ दिवसीय महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. या प्रसंगी राज्याचे आरोग्य मंत्री मा. ना. प्रा. डॉ. तानाजी सावंत उपस्थित होते.

पुणे - आषाढी एकादशीनिमित्त देहू-आळंदी ते पंढरपूर दरम्यान निघालेल्या पालखी मार्गावर 6,64,607, तर पंढरपूर येथील महाआरोग्य शिबिरांमध्ये 5,00,077 अशा एकूण 11,64,684 वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचारात्मक आरोग्य सेवा पुरवून राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने विक्रमी कामगिरी केली आहे.

मा. ना. श्री. एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री, तसेच मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, व मा. प्रा. डॉ. तानाजी सावंत, आरोग्य मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली देहु-आळंदी ते पंढरपुर या पालखी मार्गावर आणि पंढरपूर येथे वारकऱ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी दि. 27 ते 29 जून 2023 या कालावधीत वाखरी, गोपाळपुर व 3 रस्ता येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करुन आरोग्य विभागामार्फत विविध आरोग्य विषयक सेवा पुरविण्यात आल्या. प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून मंदिर परिसरामध्ये, वाळंवट ठिकाणी 3 व 65 एकर येथे 1 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या माध्यमातून सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 10 बेड क्षमतेच्या अतिदक्षता विभागासह व पंढरपूर शहरामध्ये 17 ठिकाणी अशा एकूण 20 ठिकाणी मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

## देहू-आळंदी ते पंढरपूर पालखी मार्गावर देण्यात आलेल्या आरोग्य सुविधेची वैशिष्ट्ये

- देहू-आळंदी ते पंढरपूर या पालखी मार्गावर एकूण 6,64,607 वारक-यांना मोफत तपासणी व उपचार करुन आरोग्य सेवा पुरविण्यात आली.
- प्रत्येकी दोन किलोमीटर अंतरावर 233 तात्पुरत्या 'आपला दवाखाना' मार्फत मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात आल्या.
- पालखी मार्गावर 24x7 अशा एकूण 194 आणि अत्यावश्यक रुग्ण सेवेसाठी 108 एकूण 75 रुग्णवाहिकांमार्फत 19,853 वारकऱ्यांना सेवा देण्यात आल्या.
- त्यापैकी 847 अत्यावश्यक वारकऱ्यांना योग्य वेळी उपचार व संदर्भ सेवा देऊन प्राण वाचविण्यात आले. त्यामुळे मृत्यूंच्या प्रमाणात घट झाली आहे.
- पुणे परिमंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद स्तरावरुन पालखी बरोबर एकूण 9 आरोग्य पथके अविरत पालखी परतेपर्यन्त कार्यरत आहेत.
- एकूण 124 आरोग्यदुतांमार्फत बाईक ॲम्बुलन्स ने पालखी मार्गावर आरोग्य सेवा पुरविण्यात आली.
- 3,500 औषधी किटचे दिंडी प्रमुखांना मोफत किट वाटप करण्यात आले.
- पालखी मार्गावरील 7,460 हॉटेल्स मधील 10,450 कामगारांची आरोग्य तपासणी तसेच पाणी नमुने तपासणी करण्यात आली.
- पालखी मार्गावर 156 टँकरव्दारे शुध्द पाणीपुरवठा करण्यात आला. तसेच पालखी व मुक्कामाच्या ठिकाणी धुर फवारणी, पाण्याच्या सर्व स्त्रोतांचे ओटी टेस्ट तसेच आरोग्य संस्थंमार्फत जैव कचरा विल्हेवाट करण्यात आली. यामुळे पालखी मार्गावर जलजन्य व किटकजन्य उद्रेक झाला नाही.
- पालखी मार्गावर आरोग्य विषयक जनजागृतीसाठी समाज माध्यमात, डिजीटल, प्रिंट, होर्डिंग्ज तसेच चित्ररथ मार्फत जनजागृती व संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्यात आले.

## पंढरपूर येथील तिन्ही महाआरोग्य शिबिराची ठळक वैशिष्ट्ये

- 3 महाआरोग्य शिबीरामध्ये व पंढरपूर मधील आपला दवाखाना (वाळवंट व इतर) दिनांक 27/06/2023 ते दिनांक 30/06/2023 या कालावधीमध्ये 5,00,077 लोकांची मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार करण्यात आले.
- महाआरोग्य शिबिरामध्ये विषयतज्ञ, एमबीबीएस व पॅरामेडिकल स्टाफ यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 3,718 व खासगी वैद्यकीय व्यावसायिक 500 तसेच स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक 1500 असे एकूण 5,718 मनुष्यबळामार्फत मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात आली.
- महाशिबिराव्दारे नेत्रविकार, हृदयरोग, किडनी, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, त्वचारोग, दंतरोग, संसर्गजन्य रोग (क्षयरोग, कुष्ठरोग), कॅन्सर या सारख्या रोगावर मोफत उपचार केलेले आहेत.
- ज्या वारकऱ्यांना शस्त्रक्रिया व सुपरस्पेशिलिटी सेवेची आवश्यकता होती, त्यांची यादी करण्यात आली असून, सर्वांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.
- महाशिबिरातून रुग्णांच्या मोफत 40 प्रकारच्या प्रयोगशाळा तपासण्या पूर्ण केलेल्या असून, रुग्णांचा प्रयोगशाळा तपासणीचा अहवाल रुग्णांच्या मोबाईलवर देण्यात आलेला आहे.
- रुग्णांना अतिविशेषतज्ञ मार्फत ऑन्कोलॉजी, न्युरो सर्जरी, गॅस्टोईट्रॉलॉजी यासारख्या वैद्यकीय सेवा मोफत पुरविण्यात आलेल्या आहेत.
- मोफत नेत्र तपासणी, मोफत 77,854 चष्मे वाटप आले आहे.
- मोतीबिंदू झालेल्या रुग्णांची यादी करुन मोफत शासकीय महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

- प्रत्येक शिबिराच्या ठिकाणी 05 बेड मनुष्यबळासह अतिदक्षता विभाग कार्यरत होते, त्यामध्ये 154 रुग्णांना सेवा पुरवण्यात आली व वारकऱ्यांचे प्राण वाचविले.
- अत्याधुनिक रेडिओ डायग्नॉस्टीक सुविधा, यामध्ये सोनोग्राफी सुविधा उपलब्ध करण्यात आली होती.
- उपचार व आरोग्य तपासणीसाठी येणाऱ्या सर्व रुग्णांना / भाविकांना मोफत अल्पोपहार व चहा पाण्याची सोय केलेली होती.
- मंदिर परिसरामध्ये आरोग्य दूतांमार्फत गर्दीच्या ठिकाणी बाईक ॲम्बुलन्सची सोय करण्यात आली होती.
- महाआरोग्य शिबिराकरीता EMS 108 च्या 15 रुग्णवाहिका व आषाढी वारीसाठी 15 रुग्णवाहिका मंदिर परिसरामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळासह तैनात करुन ठेवलेल्या होत्या.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिबिराला भेट देऊन रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांची माहिती घेतली व रुग्णांशी, डॉक्टर, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. रुग्णांना पुरवण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांची त्यांनी प्रशंसा केली व उत्कृष्ट नियोजनाबद्दल आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांचे कौतुक केले. सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून सरकार आरोग्यासाठी विविध योजना राबवित आहे. याचा सामान्य माणसाला फायदा होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



महाआरोग्य शिबिरामध्ये मार्गदर्शन करताना आरोग्य मंत्री मा. ना. प्रा. डॉ. तानाजी सावंत.



पालखी सोहळ्यामध्ये वारकऱ्यांसमवेत सहभागी झालेले आरोग्य मंत्री मा. ना. प्रा. डॉ. तानाजी सावंत व खा. डॉ. श्रीकांत शिंदे

# सार्वजनिक आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या सेवेशी !

















# सार्वजनिक आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या सेवेशी !


















# सार्वजनिक आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या सेवेशी !















# सार्वजनिक आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या सेवेशी !


















# " राष्ट्रीय डेंग्यू दिवस "

16 मे

**सत्यजीत टिप्रेसवार** आरोग्य पर्यवेक्षक प्र (हिवताप) भोकर, मुदखेड तालुका,
आरोग्य सहाय्यक, ग्रामीण रुग्णालय भोकर जि. नांदेड.

**" डेंग्यू "** हा अतिशय गंभीर आजार आहे. दरवर्षी 16 मे हा दिवस " राष्ट्रीय डेंग्यू दिवस" म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश लोकांना डेंग्यू आजार बद्दल माहिती व जनजागरण करणे हा आहे.

डेंग्यू ताप हा विशिष्ट विषाणुमुळे होतो. डेंगीचा प्रसार हा " एडिस इजिप्टाय " नावाच्या डासामुळे होतो. या डासाची उत्पत्ती साठवलेल्या स्वच्छ पाण्यात होते. कोणतेही पाणी 8 दिवसापेक्षा जास्त दिवस साठवून ठेवल्यास त्यामध्ये डास अंडी घालतात. त्यानंतर अंड्याचे रुपांतर डासात होते. कोणतेही साठविलेले पाणी हे आठ दिवसांपेक्षा जास्त साठवून ठेवू नये. याबाबत नागरिकांनी खबरदारी घेणे आवश्यक असून डासाची उत्पत्ती कमी करुन नियंत्रणात ठेवण्यासाठी आरोग्य यंत्रणेला जनतेचे सहकार्य आवश्यक आहे.

सध्या उन्हाळा सुरु असल्याने जिल्ह्यात पाण्याचा तुटवडा असल्याने नागरिकांकडून पाणी साठविण्याचे प्रमाण जास्त प्रमाणात आढळून येते. त्या अनुषंगाने साठविलेल्या पाण्यात एडिस इजिप्टाय डास अंडी घालतात. त्यातून डासोत्पत्ती होते.

" डेंग्यू " हा अत्यंत गंभीर आजारांपैकी एक आहे. दरवर्षी लाखो लोक या आजाराने ग्रस्त आहेत. तर काही लोकांसाठी हा आजार जीवघेणाही ठरतो. विशेषतः पावसाच्या सुरुवातीच्या काळात डेंग्यूचे रुग्ण सर्वाधिक आढळतात. अशा परिस्थितीत लोकांनी डेंग्यू या आजारा बाबत जागरुकता बाळगली पाहिजे. दरवर्षी 16 मे हा दिवस " राष्ट्रीय डेंग्यू दिवस " म्हणून साजरा केला जातो. यामागचा इतिहास जाणून घेणं गरजेचं आहे.

" राष्ट्रीय डेंग्यू दिवस " 16 मे हा का साजरा केला जातो, याच कारण आणि इतिहास याबद्दल थोडीशी माहिती.

### राष्ट्रीय डेंग्यू दिवसाचा इतिहास

दरवर्षी 16 मे हा " राष्ट्रीय डेंग्यू दिवस " म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना या आजाराबद्दल जागरुक करणे आणि त्याची लक्षणे, कारणे आणि उपचारांबद्दल माहिती देणे. हा दिवस आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालया तर्फे साजरा केला जातो. या आजाराबाबत लोकांमध्ये पूर्वीपेक्षा जास्त जागरुकता असली तरी तरी ही ते या आजाराला लोक बळी पडतात. डेंग्यू या आजाराबाबत लोकांमध्ये जनजागृती व्हावी आणि त्याबाबत अचूक माहिती व्हावी यासाठी शासन स्तरावर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

### डेंग्यू आजाराची कारणे

डेंग्यू हा डासांपासून पसरणारा रोग आहे. साचलेल्या स्वच्छ पाण्यामध्ये डेंग्यूच्या अळ्या वाढतात. डेंग्यूचा डास चावल्याने डेंग्यू होतो. जुलै ते ऑक्टोबर हे महिने डेंग्यूच्या अळ्यांच्या प्रजननासाठी अनुकूल असतात. या काळात पावसामुळे वेगवेगळ्या ठिकाणी पाणी साचण्याची शक्यता अधिक असते. अशा साचलेल्या पाण्यात डेंग्यूच्या अळ्या वाढू शकतात. डेंग्यूमध्ये अनेक प्रकारची सुरुवातीची लक्षणे दिसू शकतात.

### डेंग्यू आजाराची लक्षणे

"एडीस एजिप्टाय" डासाच्या संक्रमणात्मक डासाच्या चाव्यानंतर पाच-सहा दिवसानंतर डेंग्युची लागण होते. डेंग्यू ताप आणि डेंग्यू रक्तस्त्रावात्मक ताप (डीएचएफ) अशा दोन प्रकारे हा आजार फैलावतो. डेंग्यू रक्तस्त्रावात्मक ताप हा एक अधिक तीव्र स्वरुपाचा आजार असून, त्यामुळे मृत्यु ओढवू शकतो. लहान मुलांमध्ये मुख्यतः सौम्य स्वरुपाचा ताप येतो. मोठ्या माणसांमध्ये अधिक तीव्रतेचा ताप सोबत डोके, डोळे दुखणे, अंगदुखी , अशक्तपणा, अंगावर लाल रंगाचा चट्टा येऊ शकतो. अंगदुखी तीव्र स्वरूपात असू शकते म्हणून याला हाडे मोडणारा ताप असेही म्हणतात. याखेरीज एकदम जोराचा ताप चढणे, डोक्याचा पुढचा भाग अतिशय दुखणे, चव आणि भूक नष्ट होणे, मळमळणे आणि उलट्या होतात. डेंगी ताप आजारात रुग्णास 2 ते 7 दिवस तीव्र स्वरुपाचा ताप येतो. डोके, सांधे, स्नायु दु:खीचा त्रास होतो. रुग्णास उलट्या होतात. डोळ्याच्या आतील बाजू दुखणे, अंगावर पुरळ येणे, नाक- तोंड यातून रक्त स्राव होतो. अशक्यतपणा, भुक मंदावते, तोंडाला कोरड पडते ही लक्षणे दिसून आलेल्या रुग्णांनी वेळेत जवळच्या शासकीय रुग्णालयात जाऊन मोफत तपासणी व उपचार करुन घेणे आवश्यक आहे.

### डेंग्यू आजार टाळण्यासाठी उपाय

ताप असेपर्यंत आराम करा. ताप कमी होण्यासाठी 'पेरासिटेमोल' गोळ्या घ्या. ताप अथवा वेदनाशामक म्हणून अस्पिरीन अथवा आयबुप्रोफेन गोळ्या घेऊ नयेत.निर्जलिकरण होऊ नये म्हणून जलपेयांचा भरपूर उपयोग करावा. (उदा. क्षार संजिवनी) रक्तस्त्राव किंवा शोकची लक्षणे असल्यास रुग्णाला ताबडतोब रुग्णालयात भरती करावे. अंग पूर्णपणे झाकणारे कपडे घालावेत मच्छरदाणी किंवा क्रीमचा वापर करावा.साठवलेले किंवा साचलेले पाणी बदलावे तसेच तुंबलेल्या गटारी वाहती करावीत तसेच खाली न करता येणाऱ्या पाणी साठ्यात, उदा. टाकी हौद यामध्ये गप्पी मासे सोडावेत.

आपल्या घरी डेंग्यू ताप सर्वेक्षणसाठी येणाऱ्या आरोग्य कर्मचारी यांना सहकार्य करा व आपण अथवा इतर कोणीही आजारी असल्यास त्वरित जवळच्या प्राथमिक आरोग्य केद्रात संपर्क साधावा.डेंगी तापाची लक्षणे आढळल्यास तपासणी व उपचार सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात, उप जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालयात व जिल्हा रुग्णालयात मोफत उपलब्ध करुन दिली आहे.झोपतांना पूर्ण अंगभर कपडे घालावीत. पांघरन घेवून

झोपावे. सायंकाळी 6 ते 8 यावेळेत दारे खिडक्या बंद कराव्यात. खिडक्यांना जाळया बसवाव्यात. झोपतांना चांगल्या मच्छरदाणीचा वापर करावा. आपल्या घरी किटकनाशक औषधीचे फवारणी पथक आल्यास घर संपूर्ण फवारुण घ्यावे. फवारलेले घर किमान दोन ते अडीच महिने सारवून रंगरंगोटी करु नये. घराच्या छतावरील फुटके डब्बे, टाकाऊ टायर्स, कप, मडकी इत्यादींची वेळीच विल्हेवाट लावावी. शौचालयाच्या पाईपला वरच्या टोकाला जाळी किंवा पातळ कपडा नेहमी बांधावा. दर आठवडयाला नाल्यामध्ये रॉकेल किंवा टाकाऊ ऑईल टाकावे.

भविष्यात डेंगीताप या आजाराचा उद्रेक होवू नाही. यासाठी काय काळजी घ्यावी याबाबत पुढील साधे व सोपे प्रतिबंधात्मक उपायांची नागरिकांनी अंमलबजावणी करावी. आपल्या घराभोवताली पाणी साचू देवू नका. घरातील पाण्याचे सर्व साठे आठवडयातून एकदा रिकामे करावीत व कोरडा दिवस पाळावा. या साठयातील आतील बाजू व तळ घासुन पुसुन कोरडा करुन पुन्हा वापराव्यात व पाण्याचे साठे घट्ट झाकणाने झाकून ठेवावेत. अंगणात व परिसरातील खड्डे बुजवावेत, त्यात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. ग्रामीण भागात ज्यांच्या शेतामध्ये शेततळे आहेत त्यांनी नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क करुन गप्पी मासे सोडावीत.

डेंगी तापाची लक्षणे आढळल्यास तपासणी व उपचार सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात, उप जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालयात व जिल्हा रुग्णालयात मोफत उपलब्ध करुन दिली आहे.किंवा बाहेर डासांची पैदास होऊ देऊ नका.घरामध्ये घाण पाणी साचू देऊ नका.भांड्यात पाणी किंवा छतावर इतर कोणतीही वस्तू असल्यास लगेच फेकून द्या.

### या गोष्टी लक्षात ठेवा

- डेंग्यूचा डास हा सामान्य डासांपेक्षा वेगळा असतो आणि तो दिवसा चावतो.
- घरामध्ये आणि आजूबाजूला डासांची पैदास होऊ देऊ नका.
- उन्हाळ्यामुळे जवळपास सर्वच घरांमध्ये कुलरचा वापर केला जातो.
- कुलरमध्ये पाणी साचल्याने त्यात डेंग्यूच्या अळ्या निर्माण होण्याचा धोका वाढतो. अशा स्थितीत कूलर वापरल्यानंतर लगेचच त्यातील पाणी रिकामे करा.
- पावसाळ्यात कुंड्या, बाटल्या किंवा इतर ठिकाणी पाणी साचू देऊ नका.

नागरिकांनी वरील प्रमाणे दक्षता घेतल्यास डासाची उत्पत्ती थांबविण्यास मोठी मदत होईल व डास चावणार नाहीत. योग्य काळजी, वेळीच केलेला उपचार प्रत्येकाला होणाऱ्या आजारापासून दूर ठेवतो. त्यासाठी किटकजन्य आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांनी हातभार लावून आरोग्य यंत्रणेला सहकार्य करावे.

# डेंग्यूला आळा घालूया,
## सर्वत्र जागरुकता पसरवूया..!

**तुम्ही आणि मी काय करु शकतो?**

- आपल्या घरातील पाण्याची भांडी व्यवस्थित झाकणे
- आपल्या घरात किंवा अवतीभवती नळगळती असू नये
- घरातील फुलदाण्यातील पाणी दिवसाआड बदलणे
- खिडक्यांना डास प्रतिबंधक जाळ्या बसविणे
- घराभोवतीचा परिसर स्वच्छ ठेवणे
- बिल्डिंगवरील पाण्याच्या टाक्या व्यवस्थित झाकलेल्या असणे

**अधिक माहितीकरिता आशा/अंगणवाडी सेविका / आरोग्य कार्यकर्ता यांच्याशी संपर्क साधावा**



# लेप्टोस्पायरोसिस, जलजन्य आजार - प्रतिबंध, नियंत्रण व उपाययोजना

**लेप्टोस्पायरोसिस**

- सर्वेक्षण- लेप्टो प्रभावित पाच जिल्हयांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय आरोग्य कर्मचाऱ्यांचा आठवडी गृहभेटीचा कार्यक्रम तयार करण्यात आला असून त्यानुसार नियमित तापरुग्ण सर्वेक्षण करण्यात येत आहे.
- सर्व आरोग्य संस्थांमध्ये लेप्टो निदानाची व्यवस्था- संशयित लेप्टो रुग्णाचे निदान विनाविलंब होऊन त्याला उपचार वेळेवर सुरु व्हावा याकरीता लेप्टो प्रभावित जिल्हयातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये तसेच ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांमध्येरॅपिड डायग्नोस्टिक किटची व्यवस्था करण्यात आली आहे. तर जिल्हा रुग्णालये व निवडक उपजिल्हा रुग्णालयात एलायझा चाचणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.



- औषधसाठा व उपचार सुविधा- सर्व लेप्टो प्रभावित जिल्हयांमध्ये लेप्टो उपचारासाठी आवश्यक अशी सर्व औषधे पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून उपकेंद्रापासून जिल्हा रुग्णालयांपर्यंत कॅप्सूल डॉक्सीसायक्लीन हे लेप्टो आजारावरील प्रभावी औषध उपलब्ध आहे.
- सर्व लेप्टो प्रभावित जिल्हयांमध्ये रक्तघटक विलगीकरण सुविधा (ब्लड कॉम्पोनन्ट सेपरेशन युनिट ) रक्तपेढयांमध्ये उपलब्ध आहे.
- प्रशिक्षण- लेप्टो प्रभावित जिल्हयातील सर्व वैद्यकिय अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि खाजगी वैद्यकिय व्यावसायिक याच्याकरीता लेप्टो प्रतिबंध व नियंत्रणासंदर्भातील प्रशिक्षण कार्यशाळां मार्फत देण्यात येते.
- आंतरविभागीय समन्वय - लेप्टोच्या प्रभावी नियंत्रणासाठी कृषि, पशुसंवर्धन तसेच नगरविकास विभागाशी नियमित समन्वय ठेवण्यात येतो.
- आरोग्य शिक्षण व जनजागृती- लेप्टोस्पायरोसिस टाळण्यासाठी सर्वसामान्य जनतेने काय दक्षता घ्यावी यासंदर्भातील संदेश हस्तपत्रिका, भिंतीवरील म्हणी, बॅनर, होर्डींग्ज अशा अनेक माध्यमातून देण्यात येत आहेत. याकरीता आकाशवाणी व दूरदर्शन माध्यमाचाही वापर केला जात आहे.

**जलजन्य आजार**

**प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपयायोजना**

- जोखमीच्या गावांची यादी तयार करणे.
- वर्षातून दोनवेळा स्वच्छता सर्वेक्षण करण्यात येते. जोखमीच्या ग्रामपंचायतीना लाल रंगाचे कार्ड देवून साथरोग प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची सूचना देण्यात येते. व जोखीमीच्या नसलेल्या गावांना हिरव्या रंगाचे कार्ड देण्यात येते.मध्यम जोखमींच्या गावांना पिवळे कार्ड दिले जाते.
- पाणी पुरवठयाच्या पाईपमधील असलेल्या गळत्या शोधणे व दुरुस्ती करणे.
- सार्वजनिक विहीरी व कुपनलिकांच्या पाण्याची जिल्हा, राज्य आरोग्य प्रयोग शाळांमार्फत नियमित तपासणी करणे.
- साथरोग नियंत्रणासाठी औषधांचा व इतर साहित्यांचा पुरेशा साठा .
- पिण्याच्या पाण्याची नियमित तपासणी करुन शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत संनियंत्रण करणे.
- रुग्ण सर्वेक्षण करणे साथरोगाच्या नियंत्रणासाठी प्रत्यक्ष सर्वेक्षण नियमित चालू असते.नियमित सर्वेक्षण हे तुरळक रुग्ण व सहवासित शोधणे यासाठी देखील उपयोगी ठरते.
- सर्व साथीच्या आजाराच्या रुग्णांवर तसेच सहवासितांवर उपचार करण्यासाठी सर्व ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे याठिकाणी उपचार व्यवस्था सुसज्ज ठेवण्यात येते.
-

**डॉ. कमलापूरकर बी.एस.**
सहसंचालक, आरोग्य सेवा, पुणे 6



# आपल्या पाल्याच्या जडणघडणीत पालक व समाजाची महत्त्वाची भूमिका

आपली मुले अभ्यासात हुशार आहेत असतीलही पण 100% यशस्वी होण्याचा प्रयत्न ज्यांनी केला ते यश मिळू शकते मग मी का नाही ? हो हे शक्य आहे ! जर इतर मुलांना आता शक्य आहे मग मला पण व्हायला पाहिजे असे होण्यासाठी धोरणात्मक पाठिंबा पालकांनी व समाजाने दिला तर हे शक्य नाही का ? आहे ना ! पालकांनो, 'ही' पंचसूत्री तंतोतंत पाळा, 100 टक्के फरक जाणवेल पालक व समाज म्हणून इतके योगदान आपण देण्याची गरज आहे !

मुलांच्या प्रगतीत पालकांचा खूप मोठा हातभार असतो. बालवयात मुलांवर अभ्यास व अपेक्षांचे ओझे न लादता त्यांच्यासोबत अधिकाधिक वेळ घालवावा.

आजच्या स्पर्धात्मक युगात शक्य नसेल ही तरी स्वतः साठी आणि पाल्यांना " Me time" ह्याचं मग नेमकं काय ? प्रत्येक शाळांमध्ये शारीरिक शिक्षण हा विषय असतोच पण काही अपवाद वगळता शहरी गर्दीच्या ठिकाणी असणाऱ्या शाळा त्यांचे मैदान असते पण ते केवळ कागदावरच राहू लागले आहे. मैदानी खेळातून मुलांचे शारीरिक, मानसिक स्वास्थ टिकून राहते, याचा विसर शाळांना पडायला नको.आपलया आसपासच्या मैदानात दररोज किमान एक तास तरी मुलांसाठी मैदानी खेळ दिलं पाहिजेच, असे तज्ज्ञांचे मत आहे. उन्हाळा सुटीनंतर आता गुरुवारपासून (ता. 15) शाळा सुरु झाल्या. अनेकदा बर्याचशा मुलांना शाळा किंवा पुढच्या वर्गात जाण्याची भीती वाटत असते.किंवा न्युनगंड असतो यावर्ष कसे होणार अशावेळी पालक व शिक्षकांनी त्या मुलांच्या मनातील भीती दूर करण्यासाठी केवळ पुस्तकी अभ्यासापेक्षाही अभ्यासक्रमच विविध उपक्रमात कसे करवून घेतले जाते हे समजून सांगण्याची गरज असते, तसेच स्पर्धांचे आयोजन करायला हवे त्यामुळे मुले सजग व तल्लख बुद्धी व स्मरणशक्ती जागृत ठेवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे ह्या पंचसूत्रीचे पालन केले तर निश्चित फरक जाणवेल.नियोजित अध्यापन तंत्रशुद्ध पद्धती केले जावे याचा सराव अंगवळणी असला की कठिण गोष्टीही सोप्या होतात त्यासाठी अंगी महत्त्वाकांक्षा आणि मग प्रयोगशीलता असली की चिकित्सक वृत्ती वाढते मुले उत्सुकता वाढवून नाविन्याची ओढ लागली जाते . पालकांनी 'हे' आवर्जून लक्षात घ्यावे पाल्यांना दैनंदिन आढावा व गरजांची पूर्तता आवश्यक आहेते कसा दिवस. अनुभवताना दिसतात याची सातत्याने पाठपुरावा केला तर मुलांच्या अध्ययन व जडणघडणीत काय घडतंय हे ज्ञात होते.

- मोबाईल, टीव्हीचा वापर कोरोना काळात आवश्यक होताच पण अनेक मुलांना मोबाईल, टीव्हीची चांगली सवय असेल आपल्या शंकांचे निरसन व संदर्भासाठी उपयोगात आणावीत पण त्यातून डोळ्याचे विकार व पाठदुखीचा त्रास होईल इथपर्यंत मजल वाढल्याची वस्तुस्थिती आहे काही अपवाद वगळता असे आढळते की 50ते 60 % मुलांना जितक्या अंतरावरील दिसायला हवं ते शक्य होत नाही मग पालक शिक्षकाांकडे आणि शिक्षक पालकांनी साांगतात तो वर्गत लक्ष देत नाही व पालकांना त्यांच्या वैचारिक जडणघडण होत आहे की नाही हे त्यांच्या लक्षात येत नाही त्यासाठी योग प्राणायाम यांचा व मैदानी खेळांचा विसर पडू नये अशावेळी पालकांनी मुलांची मोबाईल व स्क्रीन टाईम योग्य कारणासाठी वापर करण्याचा आग्रह केला पाहिजे. जेणेकरुन त्यांची सवय चांगल्या प्रकारे उपयोग होण्यास निश्चितपणे मदत होईल.तसेच त्यांनी दिवसातून एक तास मैदानी खेळ व अभ्यासाकडे लक्ष देवू केलेच पाहिजे.

- मुलांचा दररोज घ्यावा शाळेतून आल्यावर करावयची नियोजनबद्ध पद्धतीने स्वयंचलीत आखून दिलेल्या ते त्यानुसार स्वेच्छेने सहज करतील आणि ती देखील इतर मुलांप्रमाणे हुशार व्हावी, अशी प्रत्येक पालकांची अपेक्षा असतेच. पण, इतर मुलांचे पालक त्यांच्या मुलांकडे वैयक्तिक लक्ष देतात, काहीजण ट्यूशन लावतात हे असुनही वैयक्तिक मार्गदर्शन हवे, मुलांना शाळेत शिकताना पडलेले प्रश्न, न समजलेला विषय पुन्हा घरी शिकवला जावा व रोजच्या रोज शिकवलेल्या सध्याची उजळणी या बाबींकडे सर्व पालकांनी आवर्जून लक्ष द्यावे आणि आपली लेकरे शाळेत काय शिकलीत, वर्गात शिकवलेले सगळे त्याला समजले का, अभ्यासात किंवा शाळेत त्याला काही अडचणी आहेत का, याकडे दररोज लक्ष द्यावे. त्यातून त्याच्या मनातील शंका, प्रश्न दूर होतील आणि दुसऱ्या दिवशीपासून अभ्यासाकडे त्याचे लक्ष राहील आणि ती अभ्यासात हुशार होऊ शकतात आणि अपेक्षित यश मिळवण्यासाठी प्रयत्न करत राहील यासाठी सातत्याने निरीक्षण करण्याची निकड आहे ती त्यांना पुरवली जाते का हे आवश्यक आहे आजच्या स्पर्धात्मक युगात 100% च्या जमान्यात आपण आपल्या लेकरांना शिस्तबद्ध पद्धतीने जगणं हे त्यांचे धाक, दमदाटी किंवा जबरदस्तीने एकाग्रता कमी होते त्यामुळे धाक डोळ्यानी आणि आवाजांनी आजकालची मुलं सहज कृती करत नाही तर अनेकदा पालक नकळतच आमिष दाखविल्यासारखे वागतात वेळेअभावी, पण त्यांना ही समज हवी की, "तू हे केलं तर मी ते देईन" असे न बोलता "तुला आपल्या भवितव्यासाठी 100% मार्कस मिळाले तर सर्वांनाच आनंद होईल " कुटुंबातील सदस्यांना तुझ्यामुळे एक नवीन ओळख निर्माण करता येईल ही ताकद तुझ्या अभ्यासावर अवलंबून आहे तू ठरव.हे सातत्याने प्रयत्नशील रहाण्यासाठी सौम्यतेने आग्रह केला पाहिजे.

- दररोज एक तास हवा मैदानी खेळ स्क्रीनच्या यथायोग्य वापरामुळे मुले मैदानी खेळ विसरल्याची स्थिती आहे. मुलांचा आवडता छंद मोबाईल व टिव्ही पाहणे हाच आहे पण हे वर्ष मुलांना योग्य नियोजनाचे व्यवस्थापन होत आहे ना हे सातत्याने निरिक्षण करणे आवश्यक आहे. त्यांना आवडता खेळ विचारले असता, बहुतेक मुलांचे उत्तर असते मोबाईलमधील व्हिडिओ गेम. पण, हा प्रकार मुलांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीच्या बाबतीत खूपच गंभीर आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक पालकांनी मुलांचा दररोज किमान एक तास मैदानी खेळ घ्यावा. शाळांनीही ही बाब गंभीरतेने घेणे आवश्यक आहे. मैदानी स्पर्धा तथा खेळांमध्ये सर्वच विद्यार्थी सहभागी होतील, याकडे देखील शाळांनी लक्ष द्यायला हवे. मुलांच्या दप्तरांचा वजनही त्यांच्या पोश्चरला कारणीभूत असते पण त्यामुळे पाठिंबा कणा वाकणार नाही व शाळेत दूर अंतरावर प्रवास करुन जात असतील तर प्रवासात मोबाईलचा उपयोग केल्यास डोळ्यांना लवकर थकवा येतो घरी पोहचे पर्यत मुलांना ऊर्जा उरत नाही हे होऊ नये म्हणून त्यांच्या मागे न लागता थोडेसे त्यांच्या कलेने सांगितले तर परिणाम चांगले असतात तसेच योग प्राणायाम यातून मन उत्साही राहील असे पाहावे.

- मुलांच्या आहार व झोपेकडे हवे विशेष लक्ष मुलांच्या तंदुरुस्तीसाठी कार्बोहायर्टेट, प्रोटिन, व्हिटॅमिन, मिनरल्स, फॅट व लोह या बाबी खूप महत्त्वपूर्ण आहेत. धान्यातून कार्बोहायर्टेट, डाळीतून प्रोटिन, व्हिटॅमिन व मिनरल्स हे भाजीपाला व फळातून, फॅट हे पनीर, दुधातून मिळते. पाणी भरपूर प्यायला हवे. मुलांच्या आहारात दररोज मोड आलेले कडधान्य हवे. फास्टफूड तथा जंकफूड द्यायला हरकत  नाही पण शरीराची प्राथमिक गरज त्यातून भागवली जाते आहे का ?  मुलांचा चहा वर्ज्य करावा.किमान 24- 16 वयाच्या मुलांपर्यंत एकदा शरीरयष्टीची रचना सुदृढ होण्यासाठी त्यांचा पोषक आहार असावा आणि रात्री किमान दहा वाजता मुले झोपायलाच हवा, म्हणजे प्रभात समयी उठण्यास कुरबुर न करता फ्रेश मुडमध्ये उठून एकाग्रतेने वागू शकतात असे नियोजन करणे जरुरी आहे.

- ब्राह्मी मुहूर्तावेळी मुलांना उठवावे आयुर्वेदात ब्राह्मी मुहूर्ताला खूप महत्त्व आहे. सूर्योदयापूर्वीच 45 मिनिटे ते सूर्योदयापर्यंत असा हा तो मुहूर्त मानला जातो. पहाटे चार ते सकाळी सहा या वेळेत मुले उठली आणि त्यावेळी केलेला अभ्यास किंवा कृती शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीच्या दृष्टीने मोलाची मानली जाते. त्यावेळी हवा शुद्ध असते, वातावरण शांत असते. त्या वेळेत सकारात्मक ऊर्जा मिळते. या मुहूर्तावेळी केलेला अभ्यास सहजपणे स्मरणात राहतो, असेही काही तज्ञाचे मत आहे . त्यामुळे मुलांची आठ तासांची झोप पूर्ण होईल, याद्दष्टिने पालकांनी मुलांना रात्री दहापूर्वीच झोपविण्याची खबरदारी घ्यावी.

आयुर्वेद तज्ज्ञ म्हणतात की, मुलांसोबतचा सुसंवाद, स्क्रीनचा वापर टाळणे, मैदानी खेळ, सकाळचा व्यायाम, वाचनाची आवड, होम वर्क, प्रात्यक्षिक व उपक्रमातून शिक्षण, मुलांचा आहार व झोप या बाबींकडे पालकांनी प्रामुख्याने लक्ष दिल्यास निश्चितपणे मुलांच्या अडचणी दूर होतील. ब्राह्मी मुहुर्ताचे पालन करावे. त्यातून मुलांची शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती वाढेल, असे वाटते की आपण पालक व समाज परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी मुलांना प्रोत्साहन द्यावे.

आपल्या सहकार्याची मुलांना गरज असते पण ते वेळीच व्यक्त होत नाहीत अंर्तमिमुखी  असलेल्या मुलांना लवकर व्यक्त होत नाहीत अशा व्यक्तींना त्यांच्या वैचारिक जडणघडणीत मंथन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे सकारात्मक मानसिकता गुणवत्ता निर्माण व्हावी यासाठी आपला सुसंवाद होणे आवश्यक आहे.आपण ते कराल व मुलांच्या उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली ही सातत्याने प्रयत्नशील ठेवण्यासाठी सहकार्य कराल यात शंकाच नाही



# उत्तरपत्रिका जूलै २०२३ - आशा उत्तरपत्रिका क्रमांक ७

वेळ :- १ तास एकूण गुण :- ३५

प्रश्न क्रं. १. योग्य पर्याय निवडा (एकुण गुण -१०)

अ) हिवताप (मलेरिया ) कोणत्या डासा मुळे होतो?.

१. ॲनॉफीलीस डासाची मादी २. culex डासाची मादी ३.एडीस डासाचा नर ४.गांधील माशी

ब) पिण्याच्या पाण्याची घरच्या घरी काळजी कशी घेता येईल?

१.मेडीक्लोर चा वापर करणे २.तोटीच्या भांडयाचा वापर करणे ३.पाणी झाकून ठेवणे ४.वरील पैकी सर्व

क) डेंगु प्रतीबंधक दिवस कोणता ?

१. ११ जुलै २. १०.ऑगस्ट ३. ७ एप्रिल ४. १६ जानेवारी

ड) हत्तीरोग कोणत्या डासामुळे होतो?

१. ॲनॉफेलीस २ .क्युलेस ३. एडीस ४. मध माशी

इ) अतिसार पंधरवडा कोणत्या ऋतूमध्ये पाळला जातो?

१.पावसाळा २. हिवाळा ३. उन्हाळा ४. प्रत्येक ऋतूमध्ये

प्रश्न क्रं. २. योग्य जोडया जुळवा. (एकुण गुण -५)

| | | |
|---|---|---|
| अ) चिकन गुनिया | (३) | १. क्युलेस |
| ब) मलेरिया | (४) | २. दुषित पाणी |
| क) हत्तीरोग | (१) | ३. एडीस |
| ड) टायफॉईड | (२) | ४. ॲनोफेलीस |
| इ) अतिसार | (५) | ५. ORS द्या |

प्रश्न क्रं. ३. चुक बरोबर पर्याय निवडा (एकुण गुण -५)

१) अतिसार झालेल्या ३ महिन्याच्या बाळाला स्तनपान करु नये. चुक/बरोबर

२) गप्पी मासे पाण्यात सोडल्याने डासांच्या उत्पत्तीला अळा बसतो. चुक/बरोबर

३) ग्रामीण भागात प्रत्येक १० बालकांमागे एकाला संसर्ग होतो. चुक/बरोबर

४) कुठला हि ताप हिवताप असू शकतो. चुक/बरोबर

५) दुषित पाण्यामुळे डेंगू आजार होतो. चुक/बरोबर

प्रश्न क्रं. ४ एका वाक्यात उत्तरे दया (एकुण गुण - ५)

१) ओ आर एस चा वापर कशासाठी करतात ?

उत्तर - अतिसार

२) हिवताप तपासणी साठी रक्ताचा नमुना कधी घ्यावा ?

उत्तर - ताप आल्यास लगेच

३) २ महिन्याच्या बाळाला क्षार संजीवनीचे द्रावण किती द्यावे ?

उत्तर - ५० मिली

४) टी.सी.एल. (ब्लिचिंग पावडर) मध्ये क्लोरीनचे प्रमाण किती असते ?

उत्तर - ३३ टक्के

५) हिवतापाचा उपचार कसा करावा ?

उत्तर - क्लोरोक्विन ची गोळी द्यावी

प्रश्न क्रं. ५ केस स्टडी. / उतारा वाचून उत्तरे दया (एकुण गुण -५)

- पावसाचे दिवस आहेत. विसापूर गावात डासांची पैदास होणाऱ्या बऱ्याच जागा आहेत यावर्षी नवीन रस्ता बांधण्यात आल्याने जागोजागी अनेक खड्डे तयार होऊन त्यात पाणी भरले आहे ४ वर्षाची चिव तिच्या आई वडिलांबरोबर राहते २ दिवसांपासून संध्याकाळी तिला खूप ताप येतो. तिची आई सांगते ती निट जेवण करत नाही ज्यावेळी ताप येतो त्यावेळी तिला थंडी वाजून हुडहुडी भरते. तुम्ही त्या गावातल्या आशा आहात.

१) चिव ला कोणता आजार झाला असेल अशी तुम्हाला शंका येते?
उत्तर - हिवताप
२) कोणत्या लक्षणावरुन तुम्हाला या आजाराबद्दल शंका येते?
उत्तर - थंडी वाजून ताप येणे, हुडहुडी
३) तुम्ही खात्री पटण्यासाठी काय कराल?
उत्तर - स्लाईड घेणे, RDT ( शिघ्र चाचणी )
४) चिऊ ला कोणता उपचार चालू कराल?
उत्तर - वयानुसार PCM देणे, हिवतापाचे निदान झाल्यास Cloroquine/ Artesunate इ. औषधे देणे व PHC ला पाठवणे.
५) प्रतिबंधात्मक उपायाबाबत काय सल्ला द्याल?
उत्तर - जास्त काळ पाणी साचू न देणे, झोपताना मच्छरदाणीचा वापर , डासांची पैदासाची जागा सुकवणे/ मातीने बुजवणे इ.

प्रश्न क्रं. ६ प्रात्यक्षिक (एकुण गुण -५)
हात धुण्याच्या पध्दतीचे सविस्तर वर्णन करा. - मुद्दे लिहा

१) हातातुन अंगठी, बांगडया आणि घडयाळ काढा
२) हात कोपऱ्यापर्यंत ओले करा.
३) पूर्ण हाताला कोपऱ्यापर्यंत साबण फस येईपर्यंत लावा. - तळहात एकमेकांवर घासा, मागील बाजू एकमेकांवर घासा, तळवे घासा, उंचवटे घासा, अंगठा खालील बाजूस धरुन घासा, मनगटे दोन्ही बाजूला घासा.
४) साबण निधेपर्यंत स्वच्छ धुवा
५) हात पुसण्यासाठी टॉवेल किंवा कापडाचा वापर करु नका.
६) हात वर धरा व हवेत सुकवा - हात वर धरा व हवेत सुकवा, कोणत्याही वस्तूला स्पर्श करु नका





# मानसिक आरोग्यासाठी टेलिमानस

टेलिमेंटल हेल्थ असिस्टंट नेटवर्किंग अक्रॉस स्टेट्स

* कुठलाही मानसिक तणाव
* परीक्षेचा ताण
* व्यसनाधिनता
* कौटुंबिक समस्या
* नातेसंबंधातील समस्या
* आत्महत्येचे विचार
* स्मृती संबंधित समस्या
* आर्थिक ताण
* इतर कोणत्याही मानसिक आरोग्य समस्या

या सारख्या मानसिक समस्या असल्यास

**कॉल टेलिमानस टोल फ्री नंबर - 14416**

## *राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, महाराष्ट्र - पुणे*

### *सर्व जिल्हानिहाय आशा स्वयंसेविका गुणानुक्रम तक्ता माहे जुलै २०२३*


| अ.क्रं | परिमंडळ | जिल्हा | तालुका | प्राथमिक आरोग्य केंद्र | आशा स्वयंसेविकेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | प्राप्त गुण | मागील महिन्यात मिळालेला मोबदला (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | ठाणे | मुरबाड | सरळगाव | श्रीमती आशा नितीन उमवणे, मो.नं. ७७९८३८३५८० | ३४.५ | ५९९५ |
| २ | *ठाणे* | रायगड | माणगाव | गोरेगाव | श्रीमती प्रणाली दिलिप भोसले, मु.पो. चिचवली, | ३५ | ४७७५ |
| ३ | | पालघर | पालघर | सातपाटी | श्रीमती अश्विनी अरुण माळी, मु.पो. खारेकुरण, मो.नं. ८३२९४५५७४० | ३४ | ६७२५ |
| ४ | | नाशिक | कळवण | उंबरगव्हाण | श्रीमती अलका महादु देशमुख, मु. पो.उंबरगव्हाण | ३४ | १२२२५ |
| ५ | | धुळे | शिरपूड | वाडी | श्रीमती कल्पना प्रकाश कोळी, मो. नं. ७९७२६९०४९९ | ३५ | ७१५६ |
| ६ | *नाशिक* | नंदुरबार | तळोदा | बोरद | श्रीमती दिपाली हर्षल पाटील, मो. नं. ७३५०९०९३३७ | ३५ | ८४०० |
| ७ | | जळगाव | चाळीसगांव | दहिवद | श्रीमती नंदा विनायक पवार | ३९ | ९०५० |
| | | अहमदनगर | श्रीगोंदा | पिंपळगाव पिसा | श्रीमती मनिषा प्रसाद शेळके | ३५ | ९४८६ |
| ९ | | पुणे | हवेली | सांगरुन | श्रीमती राणी सुधिर घुमे, मु.पो. सांगरुन, मो. नं. ९२८४६११०३७ | ३५ | १५७२५ |
| १० | *पुणे* | सातारा | पाटण | सोनवडे | श्रीमती वनिता शिवाजी पाटील मु.पो सुळेवाडी, ता.पाटण जि.सातारा मोबाईल नंबर ८१७७९०८५८२ | ३४ | ८७५० |
| ११ | | सोलापूर | द. सोलापूर | आरुड | श्रीमती अनिता सिंधराम हातुरे, मो. नं. ९३२२७४४०४८ | ३५ | १२७३५ |
| १२ | | कोल्हापूर | शिरोळ | दानोळी | श्रीमती अनिता तानाजी राऊत, गाव- दानोळी ७३८५७९४१२० | ३५ | ८४९० |
| १३ | | सांगली | वाळवा | वाळवा | श्रीमती मनिषा कदम, मु.पो. नवेखेड, मो. नं. ७७५८००३२११ | ३५ | ९०७५ |
| १४ | *कोल्हापूर* | सिंधुदुर्ग | कुडाळ | कसाल | श्रीमती सायली सोमा पाटकर, मु. पो. अणावृ ता. कुडाळ, मो.नं. ८५५०९०९५१८ | ३५ | ३४८० |
| १५ | | रत्नागिरी | दापोली | पिसोई | श्रीमती सुचिता सुधीर पाटणे, मो. नं. ९६०७३१६६९० | ३५ | ५०१० |
| १६ | | औरंगाबाद | पैठण | पिपंळवाडी | श्रीमती रुखमण लक्षमण बोबडे, वाहेगाव, ता पैठण, जि.औरंगाबाद. मो.नं.- ९९२२०९३८३६ | ३४ | ४९७५ |
| १७ | *औरंगाबाद* | जालना | भैकरदन | केदारखेडा | श्रीमती सखुबाई भिमराव आगळे, पत्ता :- गव्हान संगमेश्वर, मोबाईल क्रं. ९८२३७८८५२० | ३२ | ७१५० |
| १८ | | परभणी | सेलु | देऊळगाव गात | श्रीमती वर्षा भगवानराव बांदल राहणार - डासाळा ७७४४०६०८७१ | ३४ | १४३००/- |
| १९ | | हिंगोली | हिंगोली | पिपंळदरी | श्रीमती वैशाली गणेश ढगे, मु.पो.पिंपळदरी, मो. नं. ९८२३६७८०४२ | ३५ | ११७०० |
| २० | | लातुर | लातूर | बिटरगाव | श्रीमती भाग्यश्री बालाजी कटके रा. रेणापूर ता.रेणापूर जिल्हा लातूर ९१४५११८२८३ | ३३ | ७८८५ |
| २१ | *लातुर* | उस्मानाबाद | **अहवाल अप्राप्त** | | | | |
| २२ | | बीड | माजलगाव | सादोळा | श्रीमती उर्मिला रामेश्वर शेंडगे गाव नाव ब्रम्हगाव मो. ९६५७१७८२७१ | ३४ | १०३५० |
| | | नांदेड | अर्धापुर | येळेगाव | श्रीमती मिना पुडंलिक सवाटे, गाव - येळगाव, मो. नं. ८३०८५३५३३२ | ३५ | ६३१० |
| २४ | | अकोला | अकोला | दहिहंडा | श्रीमती वनिता प्रशांत शेलवट, मु.पो. दहिहंडा, मो. नं. ७५०७४९८६८४ | ३५ | ९२६५ |
| २५ | | वाशिम | कारंजा | उम्बर्डा | श्रीमती सीमा गजानन सावद | ३५ | - |
| २६ | *अकोला* | अमरावती | वरुड | आमनेर | श्रीमती पुष्पा सोमेश्वर राऊत मु.पो. सुरळी ता.वरुड मो.नं- ७६६६०४५१८४ | ३४ | ५०५० |
| २७ | | यवतमाळ | कळंब | नाझा | श्रीमती शालुबाई गजानन मुरखेडे, मु. पो. परसोडी बु. मो. नं. ९९२३४८६९०३ | ३४ | ७२१५ |
| २८ | | बुलढाणा | नांदुरा | शेंबा | श्रीमती भारती विठ्ठल दांडगे, गाव - शेंबा, मो. नं. ८३०८३४३७०३ | | |

| अ.क्रं | परिमंडळ | जिल्हा | तालुका | प्राथमिक आरोग्य केंद्र | आशा स्वयंसेविकेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | प्राप्त गुण | मागील महिन्यात मिळालेला मोबदला (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | नागपूर | नागपुर | रामटेक | नगरधन | श्रीमती प्रिया विनोद गजबे, मु. बोरडा मो. नं. ७०५७९७८६०२ | ३४ | ४५७५ |
| ३० | | वर्धा | समुद्रपुर | गिरड | श्रीमती अश्विनी उमेश वाघमारे, मु.पो. गिरड, मो.नं. ७७७००७८७१५ | ३४ | १३१९५ |
| ३१ | | भंडारा | पवनी | कोंढा | श्रीमती पोर्णीमा मनोज बारसागडे, मु.पो.केसलवाडा त.पवनी जि.भंडारा, मो. नं. ७४९९७४६६७० | ३५ | ८४५० |
| ३२ | | गोंदिया | अर्जुनी/मोर. | गोठणगांव | श्रीमती नुतन भक्तप्रल्हाद बावणे, मु. जरुघाटा ९०२१९४२९२८ | ३३ | ६२२० |
| ३३ | | चंद्रपूर | चिमूर | मासळ | श्रीमती वैशाली नरेश पाटील, गाव - पळसगाव, मो. नं. ९७६७८५३२३४ | ३५ | ९१०० |
| ३४ | | गडचिरोली | कुरखेडा | कढोली | सौ. छाया गोपीनाथ सुकारे, रा. उराडी पोस्ट उराडी तालुका कुरखेडा ( मो. ९४२३७२४२८४) | ३४ | ७४५५ |

# ताणतणावांचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन करता येणे महत्त्वाचे आहे

आपल्या सगळ्यांनाच कधीना कधी तणाव सहन करावा लागतो. घरी, कामाच्या ठिकाणी किंवा आजूबाजूला परिस्थिती त्रासदायक असेल तर तणाव येतो. हा त्रास दूर झाला की आपला तणावही नाहीसा होतो.

पण, ताणतणावांपासून मुक्तीच मिळत नसेल किंवा अनेक वेगवेगळ्या कारणांमुळे तीव्र तणाव येत असेल तर आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. म्हणूनच, तणावामुळे आपल्यावर होणारे परिणाम समजून घेणे, तणावामागची कारणे जाणून घेणे, तसेच आवश्यक असेल तेव्हा योग्य मदत मिळवणे हे महत्त्वाचे आहे.



## ताणतणाव कमी करण्यासाठी काय करता येईल?

- मनाला विश्रांती मिळावी यासाठी काही मार्ग शोधा आणि त्यांचा आपल्या रोजच्या दिनचर्येत नेहमी समावेश करा
- वेळेचे नियोजन करा
- धूम्रपान, मद्यपान सोडून द्या
- सकस आहार घ्या
- आपल्या समस्या आणि चिंता एखाद्या विश्वासू व्यक्तीला मोकळेपणाने बोलून दाखवा

**कोणतेही मानसिक समस्या असल्यास टेलिमानस टोल फ्री क्रमांक 14416 वर संपर्क साधा.**

# आरंभ उपक्रम

## बालसंगोपन विषयावर सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानात प्रशिक्षण संपन्न

महिला व बालविकास विभाग व आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या साह्याने तसेच युनिसेफ आणि महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्थान सेवाग्राम यांच्या संयुक्त विद्यमानाने आरंभ उपक्रम मागील 3 वर्षापासून औरंगाबाद व यवतमाळ जिल्ह्यातील एकूण 10 तालुक्यामध्ये प्रभावीपणे सुरू असून आता हाच "आरंभ उपक्रम विस्तारीत स्वरुपात संपूर्ण महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येत आहे.

दिनांक 22.02.22 ते 26.02.22 दरम्यान "आरंभ" उपक्रमात समाविष्ट असलेल्या नागपूर आणि अकोला विभागातील आरोग्य विभागाच्या एकूण अकरा जिल्ह्यातील निवडक मुख्य प्रशिक्षकाचे प्रथम टप्प्याचे प्रशिक्षण सेवाग्राम येथील सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान येथील प्रशिक्षण केंद्रात आरंभ टीम मार्फत घेण्यात आले.



सदर प्रशिक्षणात या विभागातील अकरा जिल्ह्यातुन आलेल्या आरोग्य विभागातील प्रत्येक जिल्ह्यातील निवडक प्रशिक्षकांच्या गटाचा समावेश होता. यामध्ये वैद्यकीय अधिकारी, जिल्हा समूह संघटक, तालुका समूह संघटक, CHO, ANM, HA, HV, आशा गटप्रवर्तक यांचा प्रामुख्याने समावेश होता.या प्रशिक्षणादरम्यान सिमीन इराणी युनिसेफ सल्लागार, राजलक्ष्मी नायर युनिसेफ सल्लागार, डॉ. गोपाल पंडगे युनिसेफ सल्लागार, डॉ. मंगेश गढरी Health Officer युनिसेफ आणि शर्मिला मुखर्जी युनिसेफ सल्लागार हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

या पाच दिवसीय प्रशिक्षणात प्रारंभिक बालविकासाचे महत्व, खेळ व संवाद, संवेदनशील पालकत्व, गृहभेट तसेच प्रतिसादात्मक आहार व आरोग्य विषयक संदेशांचा बालसंगोपनाकरीता कसा वापर करता येईल आणि बालसंगोपनामध्ये कुटुंबातील व्यक्तीचा समावेश किती महत्वाचा आहे याची सविस्तर माहिती देण्यात आली. कौटुंबिक स्तरावर बालसंगोपनाची माहिती पोहचविण्याकरीता उपयुक्त असलेल्या गृहभेट या माध्यमाचा प्रभावी वापर करून कुटुंबाचे सक्षमिकरण कसे करता येईल याचे महत्व प्रात्यक्षिकांसह समजावून सांगण्यात आले. प्रशिक्षण कंटाळवाणे होऊ नये यासाठी प्रशिक्षणामध्ये भूमिकानाट्य, खेळ, गाणे यांचा प्रभावी वापर करण्यात आला.

आरोग्य यंत्रणेतील विविध पदावर आणि विविध अनुभव असलेले प्रशिक्षक प्रशिक्षणामध्ये सहभागी असल्यामुळे प्रशिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यावर देखील प्रशिक्षणादरम्यान भर देण्यात आला होता..

प्रशिक्षणाच्या शेवटी सर्व सहभागींनी बालसंगोपनाची मिळालेली नवीन माहिती गृहभेट तसेच इतर मध्यमांमार्फत समुदायापर्यंत पोहचविण्याचे मनोगत व्यक्त केले.

अशा प्रकारे अगदी आनंदी आणि खेळीमेळीच्या वातावरणात आरंभ उपक्रमाचे पाच दिवसीय प्रशिक्षण पार पडले.

### आरंभ प्रशिक्षण - एक अविस्मरणीय अनुभव, एक अनुकरणीय सत्य

माझे सेवाग्राम येथील सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान येथे आरंभ सुरवातीचे क्षण मोलाचे या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या विषयाचे प्रशिक्षण झाले. आणि या आरंभ या प्रशिक्षणातमध्ये काय शिकविले जाईल, याची क्यूर्योसिटी होतीच परंतु त्या दिवशी झालेल्या विषयाच्या परिचयानेच माझी झोप उडाली. बाळाच्या सुरवातीच्या 1000 दिवसाला इतके अनन्य साधारण महत्त्व आहे. याची कल्पना नव्हती. किंवा याकडे इतके लक्षच दिले जात नव्हते. प्रथम दिवसाच्या प्रशिक्षणानंतर संध्याकाळी मी मित्रांची भेट घेतली आणि त्यांना विचारले की, तू तुझ्या बाळासोबत बोलणे केव्हा सुरु केले? बाळाला नजर केव्हा येते? बाळासोबत केव्हापासून बोलायला हवे? इत्यादि प्रश्न व प्रश्नांची उत्तरे चुकीची मिळाली. बाळाच्या पहिल्या दोन वर्ष म्हणजे सुरवातीचे 1000 दिवसाचे महत्त्व मला या प्रशिक्षणातून संपूर्णतः कळले आणि त्याचा प्रसार करणे मी त्याच दिवसापासून सुरु केले.

आरंभ प्रशिक्षण हे अत्यंत व्यवस्थितपणे अत्यंत अभ्यासू, अनुभवी आशा प्रशिक्षकांच्या मदतीने झाले, डॉ. ईराणी मॅडम अनुभवाचे बोल ऐकून मन धन्य झाले. डॉ पडगे सर, डॉ. सुबोध सर, डॉ. मंगेश सर, डॉ. राजी मॅडम सर्व प्रशिक्षक अत्यंत अनुभवी आणि उत्कृष्ठ उत्तम असे होते. डॉ. शर्मिला मॅडम यांनी संपूर्ण प्रशिक्षणाला त्यांच्या मायेच्या स्पर्शाने अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये विविध बालगीतांचा वापर करुन, प्रौढ शिक्षणाच्या तत्वाचे पूर्णतः पालन करुन सर्वांना समजेल व समानतेच्या वातावरणात सर्व प्रसार साहित्यांचा वापर करुन पाच दिवसाचे प्रशिक्षण कसे संपले काही कळलेच नाही. आता वाट आहे द्वितीय प्रशिक्षणाची. माझ्यामते सदर प्रशिक्षण हे खूप आधी व्हायला हवे होते. परंतु जिथून नवी सुरवात तोच आरंभ समजावा. हे या प्रशिक्षणातूनच शिकले. मला या प्रशिक्षणाची जी संधि मिळाली त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो.

धन्यवाद!

**डॉ. प्रशांत वाडिभस्मे**
(आरंभ मास्टर ट्रेनर)
वैद्यकीय अधिकारी प्रा. आ. के. सालईकलाता. सेलू, जि. वर्धा



## “सुंदर माझा दवाखाना"

जागतिक आरोग्य दिनी आम्ही केला एक दृढ संकल्प
नाशिक जिल्ह्यात साकारू आम्ही एक छानसा प्रकल्प

स्वच्छ सुंदर आरोग्य केंद्र, आरोग्यसेवा चालू निरंतर
गावोगावी आम्ही उभारू, आरोग्य सेवेची मंदिरं

उपचारापेक्षा प्रतिबंध बरा, हाच आरोग्याचा मंत्र खरा
आरोग्यदायी सवयींचा अंगीकार करा, व्यसनांना दूर सारा

रोगमुक्त, व्यसनमुक्त, तंटामुक्त ,कचरामुक्त खेडी
दारोदारी आम्ही उभारू आरोग्य व पोषणाची गुढी

आशा म्हणजे आरोग्याची चालती बोलती शाळा
सारे मिळूनी दूर करूया रोगाची अवकळा

सुंदर माझे आचार, सुंदर माझे विचार,सुंदर मी होणार
'सुंदर माझा दवाखाना', 'सुंदर माझा जिल्हा' मी करणार

'सुंदर माझा दवाखाना',' सुंदर माझे निवासस्थान'
मुख्यालयी थांबून मी आरोग्य सेवा देणार

कवी - जयराज सूर्य, दिंडोरी
प्रताप सिंह राजे घोरपडे
डॉ. प्रतापराव बळवंतराव देशमुख, नाशिक

## परोपकारी सोयरे

वडाच्या पारंब्या..
भुईला टेकल्या
रानातल्या मुलांनी
खेळ तिथे मांडिला !

आंब्याच्या झाडांची
किती गर्द सावली
गाई-गुरे वाटसरु
सावलीत विसावली !

चिंचेच्या झाडाला
लहान-थोरांचा गराडा
रानच्या या मेव्यासाठी
सुटे तोंडाला!

उंबराच्या झाडाला..
म्हणतात औदुंबर..
पक्ष्यांच्या न्याहरीसाठी..
पिकली गोड उंबर!

पिंपळाच्या झाडाभोवती,
बांधलेला पार...
संध्याकाळी पारावर,
गप्पा-गोष्टी रंगणार !

तुळशीच्या झाडाला,
अंगणात मान..
शुध्द हवा पुरवी,
तुळस औषधी छान !

नारळाच्या झाडाला
म्हणतात कल्पवृक्ष,
प्रत्येक भागाचा उपयोग
अनुभव येतो प्रत्यक्ष !

लिंबाच्या झाडांची,
काय वर्णावी ख्याती !
पूर्वीपासून ओळखती
औषधाची वनस्पती !

अशी ही झाडे...
परोपकारी सोयरे..
त्यांच्या शिवाय जगणे
व्यर्थ वाटे सारे !

म्हणूनच सर्वांनी..
ध्यानी धरू गोष्ट
झाडे लावून जगवू
कितीही पडोत कष्ट !

बाळकृष्ण बाचल
विद्यानगर, पुणे ३२



# आरोग्य भवन येथे स्व. वसंत नाईक यांची 110 वी जयंती साजरी

मुंबई - आरोग्य सेवा आयुक्तालयात आरोग्य भवन, मुंबई येथे आज दिनांक 1 जुलै 2023 रोजी स्व. वसंतरावजी फुलसिंग नाईक यांची 110 वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. स्व. वसंतरावजी नाईक हे प्रख्यात कृषीतज्ञ, प्रगतशील शेतकरी व राजनितीज्ञ होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक काळ होते. त्यांचा जन्म यवतमाळ जिल्ह्यातल्या पुसद तालुक्यातील गहुली या छोट्याशा खेड्यातील एका सधन शेतकरी कुटुंबात झाला होता. स्व. नाईक हे महाराष्ट्रातील हरित क्रांती, पंचायत राज तसेच श्वेतक्रांती व रोजगार हमी योजनेचे जनक मानले जातात. माजी राष्ट्रपती भारतरत्न प्रणव मुखर्जी यांनी "वसंतराव नाईक हे भारत मातेचे थोर सुपूत्र आहेत" या शब्दात नाईकांचा गौरव केला. . इ.स. 1972 मधील महाराष्ट्रातील भीषण दुष्काळादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांसाठी मदतीच्या दूरगामी योजना राबवल्या.

वसंतराव नाईक यांना केवळ शेतकर्यांच्या प्रश्नांचीच जाणीव नव्हती, तर दूरगामी स्वरुपाच्या उपाययोजना सुद्धा त्यांनी राबविल्या. शेती आणि शेतकऱ्यांशी त्यांची नाळ कायम जुळलेली होती. कठीण काळातही विचारधारेच्या क्रांतीकारी कार्य नाईकांनी केले. त्यामुळे त्यांना 'शेतकऱ्यांचा जाणता राजा', 'हरितयोद्धा' म्हणून संबोधले जाते. प्रसिद्ध साहित्यिक एकनाथराव पवार यांनी 'आधुनिक भारताचे कृषिप्रधान भारताचे कृशिसंत' या शब्दांत वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे. अशा या लोकाभिमुख विचारधारेच्या महानायकास विनम्र अभिवादन.



---

# महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण कार्यान्वित व हाफकिन खरेदी कक्षाकडील प्रलंबित विषयांचा आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्याकडून आढावा

पुणे/मुंबई: राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांकरिता लागणाऱ्या वैद्यकीय बाबींच्या खरेदीसाठी फेब्रुवारी, 2023 मध्ये नव्याने मंजूर करण्यात आलेल्या "महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण" तात्काळ कार्यान्वित करणे व हाफकिन खरेदी कक्ष यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा प्रा.डॉ.तानाजी सावंत, आरोग्य मंत्री यांनी आढावा घेतला.



यावेळी आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तथा हाफकिन खरेदी कक्षाचे प्रभारी व्यवस्थापकीय संचालक अभिमन्यू काळे, सहसंचालक डॉ. गौरी राठोड व इतर संबंधित अधिकारी यांची यावेळी उपस्थिती होती.

या बैठकीत "महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण" तात्काळ कार्यान्वित करण्याच्या सूचना देवून, आगामी पर्जन्यकाळात आरोग्य संस्थांमध्ये पुरेसा औषध साठा उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधिकरणाच्या माध्यमातून त्वरीत कामकाज सुरु करण्याचे निर्देश आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी दिले. याशिवाय, हाफकिन खरेदी कक्षाकडे उपलब्ध असलेली अखर्चित रक्कम परत करण्याची कार्यवाही करावी आणि आजपासून पुढील खरेदीची कार्यवाही प्राधिकरणाच्या माध्यमातून करण्याच्या सूचना दिल्या. या बैठकीस आरोग्य विभागातील संबंधित कार्यक्रम प्रमुख दृकश्राव्य पद्धतीने उपस्थित होते.

# पावसाळ्यातील आरोग्यविषयक तयारीचा आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्याकडून आढावा

पुणे - पावसाळ्यात उद्भवणारे आजार व पूर परिस्थिती यावर प्रभावीपणे त्वरित कार्य करण्यासाठी आरोग्य विभागाने जिल्हा पातळी व गाव पातळीपर्यंत केलेल्या आरोग्य सेवा तयारीचा डॉ.तानाजी सावंत, आरोग्य मंत्री यांनी आढावा घेतला. यावेळी आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांची यावेळी उपस्थिती होती.

या बैठकीत जोखीमग्रस्त गावे ओळखून त्याच्याप्रमाणे टीम तयार करून शीघ्र प्रतिसाद पथके सज्ज ठेवावीत, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे व उद्रेक झाल्यास त्वरित उपाययोजना करण्यात यावी, तयारीसाठी जिल्हा स्तरावरील अहवाल रोजच्या रोज तयार करण्यात यावा व त्यावर बारकाईने लक्ष ठेवण्यात यावे, पिण्याच्या पाण्याचे स्तोत्र तपासून पाहावेत ज्यामुळे पाणी पिण्यास योग्य आहे किंवा नाही याची खात्री केली जावी, जिल्ह्यातील नोडल ऑफिसर त्यांचे दूरध्वनी क्रमांक याची यादी तयार करून ती प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अद्यावत ठेवावी व राज्य स्तरावरही पाठवावी, साथरोग नियंत्रणासाठीच्या किट वाटप करण्यात याव्यात व त्याचा अद्यावत अहवाल तयार ठेवावा, आशाताई व आरोग्य कर्मचारी यांच्या याद्यासुद्धा जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडे ठेवण्यात याव्यात तसेच डास उत्पत्ती ठिकाणे यावरही लक्ष द्यावे व पाणी साठे चांगले राहतील यावरही लोकसहभागाद्वारे नियंत्रण ठेवावे, शीघ्रकृती पथकाद्वारे तयार करावयाचे कामे तसेच सूचनासाठी एक बुकलेट तयार करण्यात यावे व मार्गदर्शक सूचना देण्यात याव्यात, औषध साठा आद्यवत करून उपलब्ध ठेवण्यात यावा, साथ रोगाबाबतची माहिती लावण्यासाठी ग्रामपंचायत, नगरपंचायत येथे बोर्ड ही लावण्यात यावेत, अशा सूचना यावेळी आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी केल्या. अतिरिक्त मुख्य सचिव यांनी साथ रोगाबाबतची माहिती लोकांपर्यंत जाण्यासाठी व्यापक जनजागृती करावी, असे सूचित केले. कठीण परिस्थितीत आरोग्य विभाग चांगली जबाबदारी पार पाडत असून पावसाळ्यातील आरोग्य परिस्थितीही व्यवस्थितपणे हाताळण्यास सर्वांनी सक्रिय रहावे, असेही यावेळी सुचविण्यात आले. यावेळी आरोग्य विभागातील विभागीय आरोग्य उपसंचालक, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी सर्व ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते.

**आरोग्य विभागामार्फत पावसाळ्यातील डेंगू,मलेरिया, जापानी मेंदूज्वर, लेप्टोस्पायरोसिस या आजारांना प्रतिबंधासाठी खालील प्रमाणे उपयोजना करण्यात आल्या आहेत.**

- जोखीमग्रस्त गावांची यादी तयार करण्यात आली आहे.
- गृहभेटी व आरोग्य कर्मचाऱ्या मार्फत सर्वेक्षण व रुग्णशोध मोहीम.
- आश्रम शाळा यांना वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या मार्फत नियमित भेटी.
- पाणी गुणवत्ता नियंत्रण 76 हजार पाणी नमुने तपासण्यात आले आहेत.
- पाण्याच्या स्त्रोतांचा सर्व्हे व प्रत्येक गावांना हिरवे, पिवळे, लाल कार्ड देण्यात आले आहेत.
- एकात्मिक कीटक व व्यवस्थापन यात परिसर स्वच्छता, डासांचे पासून वैयक्तिक संरक्षणसाठी मच्छरदाणी, डास प्रतिबंधक क्रीम, खिडक्यांना जाळ्या बसविण्याबाबत समुपदेशन करण्यात आले.
- प्रयोगशाळा सिद्धता
- पुरेसा औषध साठा
- शीघ्र प्रतिसाद पथके यांची स्थापना.
- गाव पातळीवर साथ रोग सर्वेक्षण तसेच अंतर विभागीय समन्वय व आरोग्य शिक्षण यावरही भर देण्यात येत आहे.





## वाघोली येथे ट्रामा केअर युनिट उभारणार

पुणे – पुणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, मौजे वाघोली, ता. हवेली येथे विशेष बाब म्हणून ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यास मान्यता मिळाली आहे. आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या विशेष प्रयत्नाने स्थापन होणाऱ्या या ट्रामा केअर युनिटमुळे जिल्ह्यातील व हायवे रोडवरील सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहे.



वाघोली येथे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव आरोग्य सेवा आयुक्तालयाने सादर केला होता. हा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार, प्राथमिक आरोग्य केंद्र, मौजे वाघोली, ता. हवेली, जि. पुणे येथे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यास एक विशेष बाब म्हणून शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या ट्रामा केअर युनिटसाठी विहीत पध्दतीने जागा उपलब्ध करून तेथे बांधकाम व पदनिर्मिती करण्यासाठी स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## शासकीय कार्यालय व परिसरात तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी

पुणे – सार्वजनिक आणि जनसामान्यांच्या आरोगाच्या दृष्टीने तसेच संसर्गजन्य आजारांना आळा घालण्यासाठी आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी शासकीय कार्यालये आणि परिसरात तंबाखू, सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करण्यास मनाई असून, या नियमाचा भंग करणाऱ्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश सार्वजनिक आरोग्य विभागाने दिले आहेत.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण तसेच कोटपा कायदा 2003 च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी राज्याचे मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नियंत्रण समितीची बैठक दिनांक 30.09.2022 रोजी घेण्यात आली होती. या बैठकीत तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ प्रतिबंध कायदा 2003 च्या कलम 4 प्रमाणे शासकीय, निमशासकीय, खासगी कार्यालये, उपहारगृहे व कार्यालयाचा परिसर इत्यादी सार्वजनिक ठिकाणी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन तथा धूम्रपान करणे व थुंकणे हे प्रतिबंधित करण्यात आले आहे. या बैठकीत संपूर्ण राज्यभर प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशा सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्या अनुषंगाने शासकीय, निमशासकीय कार्यालये आणि परिसरामध्ये दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

धूम्रपान आणि तंबाखूच्या सेवनापासून युवा पिढीला आणि जनसामान्यांना दूर ठेवण्याकरिता केंद्र शासनाने सिगारेट आणि तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात, प्रतिबंध व व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे नियमन) कायदा 2003 (कोटपा कायदा-2003) तयार केला आहे. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे मानवी शरीरावर दुष्परिणाम होतात. असंसर्गजन्य रोगामधील कर्करोग, हृदयविकार, मानवी हृदयाशी निगडित रोग, फुफुसांचा कर्करोग असे गंभीर आजार होण्याची शक्यता बळावते. भारतामध्ये दरवर्षी होणाऱ्या मृत्यूमध्ये 8.9 लाख मृत्यू हे तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन केल्यामुळे होत असतात. सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान केल्यामुळे आणि थुंकल्यामुळे यामधून स्वाईन फ्लू, क्षयरोग निर्मानिया आणि पोटाचे विकार इत्यादी संसर्गजन्य आजार पसरतात.

सार्वजनिक ठिकाणी ज्यामध्ये शासकीय, निमशासकीय कार्यालय, खाजगी कार्यालय शासकीय संस्था कार्यालयातील कामाची जागा, उपाहारगृहे, शाळा व महाविद्यालये यांचा समावेश होतो. तेथे नागरिकांच्या आरोग्य संरक्षणाकरीता सिगारेट, तंबाखू व तंबाखूजन्य इतर उत्पादने प्रतिबंधक कायदा 2003 च्या कलम 4 अन्वये तंबाखू खाणे/ बुकणे/ धूम्रपान करण्यास प्रतिबंध आहे. शासकीय इमारतीच्या परिसरामध्ये धूम्रपान आणि थुंकणे हा दंडात्मक गुन्हा आहे.

# 1 कोटी लाभार्थ्यांना आयुष्मान ई-कार्डचे वितरण करण्याचे मा. आरोग्य मंत्र्यांचे निर्देश

पुणे - महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत 96.94 लाख वैयक्तिक लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड (ई-कार्ड)चे वाटप करण्यात आले असून, 31 जुलैपर्यंत ही संख्या वाढवून 1 कोटी लाभार्थ्यांना ई- कार्डचे वितरण करण्यात यावे, असे निर्देश राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी दिले आहेत.



महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांना को-ब्रॅन्डेड कार्ड वितरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार या योजनेतील पात्र लाभार्थ्यांना को-ब्रॅन्डेड कार्ड वितरित करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्याचे निर्देशही प्रा. डॉ. सावंत यांनी दिले आहेत. एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत ई-कार्ड वाटपाबाबत प्रा. डॉ. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली 12 जुलै रोजी आढावा बैठक घेण्यात आली. श्री. मिलींद म्हैसकर, अपर मुख्य सचिव-1, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, श्री. एन. नवीन सोना, सचिव-2, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. धीरज कुमार, आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, श्री. विनोद बोंद्रे, मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, श्री. शि. म. धुळे, उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. संजय महाडेश्वर, अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. दिलीप कवठेकर, महाव्यवस्थापक (प्रशासन), रा. आ. ह. सोसायटी या बैठकीला उपस्थित होते.

आयष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत दि. 11.07.2023 पर्यंत 96.94 लाख पात्र लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड (ई-कार्ड) वितरित करण्यात आले आहेत. तसेच योजनेंतर्गत नियुक्त तृतीय पक्ष प्रशासक कंपन्याकडून शिबीरे आयोजित करुन आरोग्य मित्रांव्दारे ई-कार्ड वितरित करण्यात आले आहेत.

दि. 28.06.2023 रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे विस्तारीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील लाभार्थ्यांव्यतिरिक्त राज्यातील उर्वरित सर्व नागरिकांना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लागू करण्याचा व सर्व लाभार्थ्यांना प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.5 लाख आरोग्य संरक्षण लागू करण्यात येणार आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांना को-ब्रॅन्डेड कार्ड वितरित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांना को-ब्रॅन्डेड कार्ड वितरित करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्याचे निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिले आहेत.

---





जागतिक योग दिनानिमित्त राज्य कुटुंब कल्याण विभाग, पुणे येथे योग सत्र घेण्यात आले.
या सत्रात कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सहभाग घेऊन योगसाधना केली.

# आरोग्य विभागाच्या योजनांसाठी केंद्र सरकारकडून निधी कमी पडू दिला जाणार नाही

## केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री डॉ.भारती पवार

मुंबई दि. 11 : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या योजनांसाठी केंद सरकार कडून निधी कमी पडू दिला जाणार नाही. अशी ग्वाही केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी दिली. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे राज्याचे आरोग्यमंत्री नामदार प्रा. डॉ.तानाजी सावंत यांचेसह आयोजित संयुक्त आढावा बैठकीत त्यांनी आरोग्य विभागाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

महात्मा फुले आरोग्य योजना व पंतप्रधान जनआरोग्य योजनेचा महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना लाभ व्हावा. एकही गरजू रुग्ण आरोग्य योजने पासून वंचित राहू नये, यासाठी विभागाने सर्वते प्रयत्न करावेत अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच येत्या काही दिवसात महाराष्ट्रातील एक कोटी नागरिकांना आरोग्य कार्ड वितरण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेचा शहरी व ग्रामीण भागात आणखी विस्तार वाढविला जात असल्याचे आरोग्य मंत्री सांगितले. यावेळी आरोग्य मंत्री यांनी सरकारी सरकारी दवाखान्याचे बांधकामाचा आढावा घेतला तसेच तातडीने कामे पूर्ण करुन जनतेच्या सेवेत सज्ज होण्याचे निर्देश दिले. या बैठकीस आरोग्य विभागाचे सचिव एन.नवीन सोना, आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार, आरोग्य संचालक डॉ. नितीन आंबाडेकर, वित्त संचालक जयगोपाल मेनन, अधिक्षक अभियंता सौ. भाईक, सहसंचालक डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालक सुभाष बोरकर तसेच जनआरोग्य योजनेचे अधिकारी हजर होते.



# कर्करोगासह असंसर्गजन्य आजारांना अटकाव करण्यासाठी आरोग्य विभाग व्यापक योजना राबविणार

मुंबई : आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयात राज्यातील असंसर्गजन्य रोगांच्या व कर्करोगाच्या वाढत्या प्रमाणावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे करीता बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला डॉ. तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रविण परदेशी, श्री.मिलिंद म्हैसकर, अति. मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. धीरज कुमार, आयुक्त आरोग्य सेवा, आशियाई डेव्हलपमेंट बँकचे पदाधिकारी, श्री. रणधीर सूर्यवंशी, खासगी सचिव, श्री. अशोक आत्राम, सह सचिव, डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालक, डॉ. विजय बाविस्कर, सहसंचालक, डॉ. माधुरी काळे, सहा. संचालक, डॉ. राहुल सोनवणे, टाटा मेमोरियल रुग्णालय उपस्थित होते.

सदर बैठकीत संसर्गजन्य आजाराच्या मुळे होणारे मुत्युचे प्रमाण हे कमी होत असून असंसर्गजन्य आराच्यामुळे होणारे मृत्यूचे प्रमानात वाढ झाली आहे तसेच कोविड आजाराच्या प्रदुर्भावात झालेल्या मृत्युच्या तुलनात्मक अवलोकनात असंसर्गजन्य रोग आजार असलेल्या रुग्णातील मृत्यूचे प्रमाण हे अधिक असल्याचे आढळून आले आहे तसेच

राज्यातील मुख्यत्वे आढळून येणारे कर्करोगात तोंडाचा कर्करोग, स्तानाचा कर्करोग आणि गर्भाशय मुख कर्करोगाचा प्रादुर्भाव जास्त आहे. सदर कर्करोगाचे निदान हे आजाराच्या प्राथमिक टप्प्यात केल्यास कर्करोग बरा होवू शकतो. कर्करोगाचे निदान प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर करणे करिता सार्वजनिक आरोग्य विभागाचे बळकटीकरण करण्यासाठी आशियाई डेव्हलपमेंट बँक बरोबर समन्वय करणे आणि राज्यात नव्याने रेडियोथेरपी उपचार रुग्णालये हब आणि स्पोक तत्वावर सुरु करण्याकरिता वैद्यकीय महाविद्यालये आणि सार्वजनिक आरोग्य विभाग आरोग्य संस्थांचे अवलोकन करण्यात यावे यावर सकारात्मक चर्चा झाली. कर्करोग नियंत्रण आणि प्रतीबंधाबाबत राज्यात धोरणात्मक उपाय योजनेकरिता आशियाई डेव्हलपमेंट बँक आणि सार्वजनिक आरोग्य विभाग समन्वयाने काम करणार आहेत.

# लेखकांना विनंती

वाचकांचे मनोगत हे सदर लवकरच सुरु करीत आहोत,
तरी लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय ई-मेल आयडीवर अवश्य कळवावा.
**e-mail: arogyapatrikamh@gmail.com**

- महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेत आरोग्यासंबंधीच्या विषयांवर लेख, कविता, यशकथा इत्यादी साहित्य प्रकाशित केले जाते.
- साहित्य अप्रकाशित असावे. लेख मुख्य संपादक तथा उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.ब्युरो) राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन इमारत, आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे 411006 या पत्त्यावर पाठवावेत. साहित्य प्रकाशित झाल्यावर अंक लेखकाला भेट दिला जातो. लेखकांनी स्वतःचा पूर्ण पत्ता दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी लिहावा.
- केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा क्षेत्र अनुभवांवरील साहित्याला प्राधान्य देण्यात येते. फक्त मराठी भाषेतील मजकुर प्रसिद्ध होतो.
- लेख/साहित्य प्राप्त झाल्यावर निवड समितीच्या मान्यतेने साहित्याची निवड केली जाते. अस्वीकृत साहित्य परत पाठविणे शक्य होत नाही. आपले लेख कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहून किंवा टंकलिखित करुन पाठवावेत. शब्द संख्या 700 ते 800 असावी.
- अपेक्षित महिन्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर संबंधित लेख या कार्यालयास प्राप्त झाल्यास छपाईचे योग्य काम योग्य वेळेत पूर्ण होऊ शकते. पुढील 3 महिन्यांसाठीचे विषय पुढे दिले आहेत.

## आरोग्य पत्रिकेसाठी पुढील महिन्यांसाठीचे विषय

### ऑगस्ट २०२३

- **१ ते ७ ऑगस्ट** — स्तनपान सप्ताह
- **६ ऑगस्ट** — जागतिक हिरोशिमा दिन
- **१० ऑगस्ट** — राष्ट्रीय जंतनाशक दिन
- **१२ ते २५ ऑगस्ट** — जागतिक युवा पंधरवडा

### सप्टेंबर २०२३

- **१ ते ३० सप्टेंबर** — पोषाहार महिना
- **५ सप्टेंबर** — राष्ट्रीय शिक्षक दिन व मज्जारज्जू दुखापत दिन
- **८ सप्टेंबर** — जागतिक साक्षरता दिन
- **१० सप्टेंबर** — जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन
- **१६ सप्टेंबर** — जागतिक ओझोन दिन व जागतिक अस्थिमज्जा दाता दिन
- **२१ सप्टेंबर** — क्षारसंजीवनी दिन
- **२५ सप्टेंबर** — जागतिक औषधनिर्माता दिन
- **२८ सप्टेंबर** — जागतिक रेबीज दिन
- **२९ सप्टेंबर** — जागतिक हृदय दिन
- **सप्टेंबर** — जागतिक कर्णबधिरता

### ऑक्टोबर २०२३

- **१ ऑक्टोबर** — रक्तदान दिन व ज्येष्ठ नागरिक दिन व जागतिक शाकाहार दिन स्तनाचा कर्करोग जागरूकता महिना
- **२ ऑक्टोबर** — स्वच्छता दिन व राष्ट्रीय व्यसनाधिनता प्रतिरोध दिन
- **७ ऑक्टोबर** — जागतिक सेरेब्रल पाल्सी दिन
- **९ ऑक्टोबर** — जागतिक दृष्टी दिन
- **१० ऑक्टोबर** — मानसिक आरोग्य दिन
- **११ ऑक्टोबर** — जागतिक बालिका दिन
- **१२ ऑक्टोबर** — जागतिक संधिवात दिन
- **१३ ऑक्टोबर** — जागतिक थ्रोम्बोसीस दिन
- **१५ ऑक्टोबर** — जागतिक हाताची स्वच्छता जागरुकता दिन
- **१६ ऑक्टोबर** — जागतिक अन्न दिन व जागतिक बधिरीकरण दिन
- **१७ ऑक्टोबर** — जागतिक आघात दिन
- **१८ ऑक्टोबर** — जागतिक रजोनिवृत्ती दिन
- **२० ऑक्टोबर** — जागतिक अस्थी विर्दीणता दिन
- **२१ ऑक्टोबर** — जागतिक आयोडीन न्यूनता विकार नियंत्रण दिन
- **२४ ऑक्टोबर** — जागतिक पोलिओ दिन
- **२६ ऑक्टोबर** — जागतिक स्थूलता दिन
- **२९ ऑक्टोबर** — जागतिक पक्षाघात दिन

## वर्गणीदारांसाठी हा बदल अवश्य लक्षात ठेवावा

- वर्गणीदाराने आपला संपूर्ण पत्ता, ईमेल आयडी व संपर्कासाठी दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक सुवाच्च अक्षरात, पिनकोडसह पाठवावा. सोबत अपूर्ण पत्ता असल्यास आरोग्य पत्रिका न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
- महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेची वर्गणी पाठविताना यापूर्वी आपण धनादेश पाठवीत होतात. आता त्यात बदल झाला असून केवळ मनीऑर्डरने वर्गणी खालील नावे पाठविण्यात यावी अथवा ती कार्यालयात रोखीने स्वीकारली जाईल.
- प्रशासकीय अधिकारी, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन इमारत, आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे 410006.

**(या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ व शासन सहमत असतीलच असे नाही. तसेच लेखातील विषयाबाबत अधिक माहितीसाठी कृपया लेखकांशी संपर्क**

**पत्र व्यवहारासाठी पत्ता**

मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक
आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग,
परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन

# पंतप्रधानांच्या हस्ते राष्ट्रीय सिकल सेल ॲनिमिया निर्मूलन अभियानाला शुभारंभ

**पुणे** - राष्ट्रीय सिकल सेल ॲनिमिया निर्मूलन अभियानाचा शुभारंभ पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत, आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित व राज्यातील खासदार यांच्या ऑनलाईन उपस्थितीत आज करण्यात आले.या कार्यक्रमाच्या वेळी राज्यातील सर्व जिल्ह्यांतील सुमारे 6200 आरोग्य संस्था स्तरावरील (जिल्हा, उपजिल्हा, ग्रामीण रुग्णालय, स्त्री रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व आरोग्यवर्धिनी) अधिकारी व कर्मचारी ऑनलाईन उपस्थित होते. प्राथमिक आरोग्य केंद्र (HWC) लहान शहादा ता. जि. नंदुरबार येथून मा. आदिवासी विकास मंत्री या कार्यक्रमासाठी ऑनलाईन उपस्थित होते.

राज्यात सिकल सेल नियंत्रण कार्यक्रम 2008 पासून 21 जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे. ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, पालघर, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, धुळे, जळगाव, बुलढाणा, नांदेड, वाशिम, अकोला, छत्रपती संभाजी नगर, रायगड आणि हिंगोली या जिल्ह्यांचा त्यात समावेश आहे.

सद्यस्थितीत राज्यात एकूण सिकल सेल रुग्ण संख्या 22082 आणि सिकल सेल वाहकांची संख्या 261633 इतकी आढळून आली आहे.या कार्यक्रमाच्या वेळी सिकल सेल रुग्ण व्यक्तींना लाल, वाहक व्यक्तींना पिवळे आणि निरोगी व्यक्तींना पांढरे कार्डाचे वाटप करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी अंदाजे 1,80,000 कार्ड वितरित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. सर्व आरोग्य संस्थांमध्ये आज सिकल सेल तपासणी करण्यात येत आहे.त्याचप्रमाणे आयुष्यमान भारत कार्ड मिळविण्यासाठी या आरोग्य संस्थामधून उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सिकल सेल तपासणी करण्यात आलेल्या व्यक्तींना जेनेटिक कार्ड देण्यात येणार आहे.







**Registered**
Maharashtra Arogya Patrika (Marathi)
**RNI No. MAHMAR/2000/1736**
**POSTAL REGD. No./PCE/017/2021-2023**
Office of Posting PUNE P.S.O., G.P.O. 411001.
The date of Publication is 20th July 2023
Posting on 24th of July 2023
**Licence to Post without prepayment of Postage No. WPP120/31/12/2023**
वार्षिक वर्गणी : ₹ ५०/-


प्रति,

पोस्टमन बंधुनो, या पत्यावर वर्गणीदार मिळत नसेल तर हा अंक कृपया आरोग्य विभागाच्या संबंधित आरोग्य केंद्र रुग्णालय किंवा आरोग्य सेविका/कर्मचारी आशा यांचेकडे द्यावा

# ताण किंवा चिंता
## असल्यास मनोसामाजिक मदत घ्या.

- सामाजिक आपात्कालीन परिस्थितीचा अथवा रोगाच्या **उद्रेकाचा** सामना करणे.
- चिंतेच्या किंवा तणावाच्या भावनांकडे दुर्लक्ष करू नका अथवा त्या दाबून ठेऊ नका.
- या रोगाने प्रभावित झालेल्या अथवा न झालेल्या लोकांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी, कसोटीचा काळ आहे.
- तुमचा कोणत्याही प्रकारचा ताण किंवा चिंता यांच्याशी संबंधित प्रश्न व समस्या हाताळण्यासाठी, मनोसामाजिक मदतसेवा सदैव उपलब्ध आहे.

**कोणतेही मानसिक समस्या असल्यास**
**टेलिमानस टोल फ्री क्रमांक**
# 14416
**वर संपर्क साधा.**



Monthly Maharashtra Arogya Patrica is printed and published by Dr. Kailas B. Baviskar on behalf of Public Health Department, Government of Maharashtra It is Printed at Kalyani Corporation, 1464, Sadashiv Peth, Pune 30. and Published at Maharashtra State Health L.E.C. Bureau, Parivartan', Arogya Bhavan Compound, Opp. Vishrantwadi Police Station, Yerawada, Pune 411 006.